दैनिक लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118
●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२८९ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, रविवार, ७ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

# शिंदे गटाच्या आमदारांचा ठाणे,रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक जागेवर दावा



**एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिवसेनेचे आमदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत ठाणे, रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि नाशिकची जागा कोणत्याही परिस्थितीत सोडायची नाही, असा निर्धार करण्यात आला आहे.**

**■ठाणे, विशाल कारंडे,**
देशात आणि राज्यात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. अनेक ठिकाणी उमेदवारांची उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी लगबग सुरू आहे. एकीकडे नेते तयारीला लागले आहेत. मात्र महायुतीच्या जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिवसेनेचे आमदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.

या बैठकीत ठाणे, रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि नाशिकची जागा कोणत्याही परिस्थितीत सोडायची नाही, असा निर्धार केला आहे. त्यामुळे जागावाटपावरून महायुतीत पुन्हा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. महायुती करताना काही तडजोडी कराव्या लागतात. मात्र आपल्या कोणत्याही विद्यमान खासदारांवर अन्याय होणार नाही असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. आपण धाडस केलं म्हणून अनेकांना सत्तेची फळं चाखता आली. त्यामुळे कुणी कितीही सांगितलं तरी आपलं महत्त्व कमी होत नाही, आपल्या हक्काच्या जागा आपण सोडायच्या नाहीत, असंही काही आमदार या बैठकीत म्हटल्याची माहिती आहे.

ठाणे, रत्नागिरी सिंधुदुर्ग, नाशिक आपल्या जागा आपण सोडायच्या नाहीत. परभणी, उस्मानाबाद या हक्काच्या जागा आपण मित्र पक्षाला दिल्या. आपण युती धर्म प्रामाणिकपणे पाळतोय. रायगडात आपल्या आमदारांनी अपमान गिळून प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यामुळे आपले उमेदवार जिथे आहेत तिथे मित्र पक्षानेही सहकार्य आणि मदतीसाठी तयार असायला हवे. ठाणे आपलेच आहे. नाशिक आपले आहे आपल्या हक्काच्या जागा आपण सोडायच्या नाहीत. पालघरही देऊ नका अशी भूमिका मांडण्यात आली आहे. एकनाथ शिंदे यांनी सर्वांच्या भावना समजून घेतल्या. युती करताना काही तडजोडी कराव्या लागतात, परंतु कोणावर अन्याय होणार नाही, अशा निश्वास शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

राज्यात ४५ पारचं लक्ष गाठण्यासाठी भाजपने आक्रमक भूमिका घेतली आहे. यासाठी भाजपने शिवसनेच्या काही जागांवर आपला दावा केला आहे. भाजपने अनेक मतदारसंघात सर्वे केला होता. त्यात अनेक जागांवरील विद्यमान खासदारांबाबत नाराजीचा सूरू असल्याचा निष्कर्ष काढण्यात आलाय. त्यामुळे निवडून येतील असे उमेदवार देण्यावर भाजपने भर दिला आहे. नाशिकमध्ये हेमंत गोडसे यांना उमेदवारी देण्यास भाजपचा विरोध आहेत. स्थानिक भाजप नेत्यांनीही ही जागा भाजपने लढवण्याचा आग्रह धरला आहे. हेमंत गोडसे यांच्याजागी आता राष्ट्रवादीकडून छगन भुजबळ यांच्या नावाचीही चर्चा आहे. यवतमाळ-वाशिम मतदारसंघातूनही भावना गवळी यांच्या नावाला भाजपचा विरोध आहे. येथे संजय राठोड यांच्या नावाचा सध्या विचार सुरु आहे. ठाण्यातील जागेवरही भाजपने दावा केला आहे.

## गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर ठरणार महायुतीचा उमेदवार

**■ठाणे, सचिन कदम :**
महायुतीचा ठाणे मतदारसंघातील उमेदवार कोण असेल याचा फैसला गुढी पाडव्याला होणार असल्याचं प्रतिपादन शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी केले आहे. महायुतीच्या लोकसभेच्या जागांची तिढा अद्यापही सुटला नाहीये. राज्यातील बहुतेक मतदारसंघात तिन्ही पक्षात वाद सुरूय. अनेक जागांवर तिन्ही पक्षांकडून दावा ठोकण्यात येत असल्याने तेथे वाद कायम आहे, या वादांच्या जागांपैकी एक जागा म्हणजे ठाणे मतदारसंघ. ठाणे मतदारसंघावरून महायुतीचा तिढा कायम असून येत्या गुढी पाडव्याचा याचा तिढा सुटणार असल्याचं प्रतिपादन शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी केलंय. गुढी पाडव्याला ठाणे लोकसभेचा महायुतीचा उमेदवार ठरणार असल्याचं म्हटलं जात आहे. दरम्यान महायुतीचा उमेदवार ठरवण्यात विलंब ठरत असल्याने अनेक नेत्यांची चिंता वाढू लागलीय. राज्यात पाचव्या टप्प्यात २० मे रोजी लोकसभेसाठी मतदान पार पडणार आहे. यावर प्रतिक्रिया देताना महायुतीचा उमेदवार गुढीपाडव्याला गुढी उभारणार असल्याचे संकेत शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी दिलेत. ठाणे लोकसभा उमेदवार मुख्यमंत्री आणि महायुतीचे वरिष्ठ नेते ठरवतील. सरकारने केलेल्या कामाच्या जोरावर आम्ही मतदारांपर्यंत मत मागण्यासाठी जातं आहोत. आमचा उमेदवार जरी ठरत नसला तरी आमचा पक्ष महायुती आणि आमचा उमेदवार पंतप्रधान नरेंद्र मोदी असल्याचं सरनाईक म्हणालेत. ठाणे महायुतीचा गड आहे, आधीपेक्षा मोठ्या मताधिक्याने महायुतीचा उमेदवार निवडून आणायचा आहे. एक चेहरा समोर आहे तो म्हणजे नरेंद्र मोदींचा आणि तोच महत्वाचा आहे . स्थानिक पातळीवर



निर्णय घेतला नसला तरी मोदींना पुन्हा पंतप्रधान बनवण्यासाठी काम करणार असल्याचे सरनाईक म्हणालेत. संभाव्य उमेदवार म्हणून यादी मोठी आहे, पण जो उमेदवार असेल त्याला निवडून आणण्याची आमच्या सर्वांची जवाबदारी आहे. महायुतीचा उमेदवार येत्या गुढीपाडव्या पर्यंत जाहीर होईल, अशी माझी खात्री आहे, गुढीपाडव्याला महायुतीच्या नावाने उमेदवार गुढी उभारणार असल्याचं सरनाईक म्हणालेत.

## कल्याणची बहुप्रतीक्षित उमेदवारी अखेर फडणवीसांकडून जाहीर

**■नागपूर, प्रतिनिधी,**
महायुतीमधील बहुप्रतीक्षित कल्याण डोंबिवली लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी अखेर जाहीर झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र आणि कल्याण डोंबिवली लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना पुन्हा एकदा तिकीट जाहीर करण्यात आलं आहे. खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी घोषित केली. कल्याण डोंबिवली लोकसभा मतदारसंघामधून श्रीकांत शिंदे हेच आमचे उमेदवार असतील, भाजपचा पाठिंबा असेल, मोठ्या मतांनी निवडून आणू असे वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केले.



भाजपच्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमानंतर नागपुरात देवेंद्र फडणवीस पत्रकारांशी बोलत होते. त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. श्रीकांत शिंदे यांनी आधीच प्रचाराचा नारळ फोडला होता. आतापर्यंत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची एकच लोकसभा उमेदवार यादी जाहीर झाली आहे. तर यवतमाळवाशिम आणि हिंगोली या दोन मतदारसंघातील उमेदवारांची स्वतंत्र घोषणा मात्र त्यात श्रीकांत शिंदे यांचं नाव नसल्याने उलटसुलट चर्चा रंगल्या होत्या. भाजपचे स्थानिक नेते श्रीकांत शिंदे यांच्या उमेदवारीस विरोध करीत असताना खुद्द फडणवीस यांनीच हे विधान केल्याने राजकीय वतुर्ळात चर्चा रंगली आहे.

## पुणेकरांच्या घशाला कोरड

### 'या' भागात तीव्र पाणीटंचाई, टँकरसाठी पालिकेकडून हेल्पलाइन नंबर



शहरातल्या काही भागातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. जेथे पालिकेला नळाद्वारे पाणी देता येत नाही अथवा पाणीपुरवठ्यात अडचण येते, तेथे पालिकेतर्फे मोफत टँकर पुरवण्यात येतात. काही भागांत टँकरचालकाकडून पैसे मागण्यात येत असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशा टँकरना पैसे देऊ नयेत. त्याचबरोबर १८००१०३०२२२ आणि ८८८८२ ५१००१ या हेल्पलाइन क्रमांकावर तक्रार करावी, त्यात टँकरचालकाचे नाव व गाडीचा क्रमांक नमूद करावा, असे पालिकेने स्पष्ट केले.

**■पुणे, अभिजीत येरुल्लू,**
शहराच्या काही भागांत शुक्रवारी सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणीपुरवठा झाल्याने नागरिकांना मनःस्ताप सहन करावा लागला. मोठ्या सोसायट्यांचे पाण्याचे नियोजन कोलमडले.

कोथरूड, कर्वेनगर, कात्रज, कोंढवा, येवलेवाडी, बाणेर; तसेच दक्षिण पुण्यात काही ठिकाणी पाणीटंचाईचा सामना करावा लागला. मात्र, काही वेळातच पाणीपुरवठा नियमित झाल्याचा दावा पालिकेने केला आहे.

पालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे पूर्वनियोजित कामासाठी गुरुवारी शहराच्या काही भागांतील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. शुक्रवारी या भागांत उशिरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होईल, असेही पालिकेतर्फे स्पष्ट करण्यात आले होते.

त्यानुसार काही भागांत शुक्रवारी नेहमीच्या वेळी पाणीपुरवठा होऊ शकला नाही. नेहमीच्या वेळेत पाणी न आल्याने नागरिकांचे नियोजन कोलमडले. काहींना खालून पाणी भरावे लागले. काही ठिकाणी टँकर मागवले गेले. सोसायट्यांच्या खालच्या व वरच्या दोन्ही टाक्या रिकाम्या झाल्याने पाणीबाणीची स्थिती निर्माण झाली. मोठ्या सोसायट्यांना आपल्या सभासदांना विनाकारण बादल्या भरून ठेवू नका, असे आवाहन करावे लागले. दुपारी बाराच्या सुमारास पाणीपुरवठा सुरळीत झाला.

'कोथरूड, कर्वेनगर, कात्रज, कोंढवा, येवलेवाडी, बाणेर आणि काही प्रमाणात खराडी भागातून पाणीपुरवठ्याविषयी तक्रारी आल्या. यातील काही ठिकाणी उशिरा पाणीपुरवठा झाला. त्यामुळे अतिरिक्त वेळ पाणी सोडण्यात आले. काही ठिकाणी टँकरद्वारे पाणी दिले गेले,' असे पाणीपुरवठा विभागप्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले.

शिवाजीनगरमधील खैरेवाडीतील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पाणी नाही, तर मत नाही, असा फलकही त्यांनी लावल्याचे छायाचित्र प्रसिद्ध झालं होते. याबाबत विचारले असता, पाणीपुरवठा विभागप्रमुख नंदकिशोर जगताप म्हणाले, 'खैरेवाडीत चढावरील भागात शेवटच्या काही घरांमध्ये पाणीपुरवठ्यात समस्या आहेत. तिथे एसएनडीटी टाकीतून पाणीपुरवठा होत होता. मेट्रोसाठीच्या कामात यातील जलवाहिनीला धक्का पोहोचला. मात्र, रस्त्याचे काम सुरू असल्याने येथे खोदकाम करणे शक्य नाही. त्यामुळे अन्य ठिकाणाहून पर्यायी टाक्यांमधून या घरांना पाणीपुरवठा केला जाईल. दोन ते तीन दिवसांत येथील पाणीपुरवठा सुरळीत होईल.'

## मध्य रेल्वेने फुकट्या प्रवाशांकडून केला ३०० कोटींचा दंड वसूल



**■मुंबई, दिगंबर जाधव,**
रेल्वे स्थानकांसह रेल्वेगाड्यांमधील अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने केलेल्या विशेष तिकीट तपासणी मोहिमेत फुकट्या प्रवाशांवर बडगा उगारण्यात आला आहे. विनातिकीट प्रवाशांकडून मध्य रेल्वेने ३०० कोटींचा दंड वसूल केला असून, यात सर्वाधिक विनातिकीट प्रवासी मुंबई विभागातील आहेत. रेल्वे स्थानकातील गर्दी व्यवस्थापनासाठी सर्व क्षेत्रीय रेल्वेला विनातिकीट प्रवाशांवर अंकुश ठेवण्यासाठी रेल्वे मंडळाने निश्चित लक्ष्य दिले होते. मध्य रेल्वेने रेल्वे मंडळाच्या निर्धारित लक्ष्यापेक्षा १२ टक्के अधिक महसूल मिळवत अग्रस्थान पटकावले आहे. एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ आर्थिक वर्षात विनातिकीट प्रवासी, अयोग्य तिकीटाने प्रवास करणे अशा प्रकरणात मध्य रेल्वेने ४६.२६ लाख प्रवाशांवर कारवाई केली. मुंबई विभागाने २०.५६ लाख प्रवाशांवर कारवाई करीत ११५.२९ कोटींचा दंड वसूल केला. मध्य रेल्वेच्या सर्व विभागांमध्ये मध्य रेल्वेने अव्वल क्रमांक पटकावला आहे. भुसावळने ६६.३३ कोटी, नागपूरने ३४.५२ कोटी, सोलापूरने ३७.७४ कोटी आणि पुणे विभागाने २८.१५ कोटींचा महसूल मिळवला आहे. मध्य रेल्वेमधील दोन महिला वरिष्ठ तिकीट परीक्षकांसह एकूण २२ तिकीट तपासणीसांनी वैयक्तिकरित्या १ कोटीहून अधिक दंड वसूल केला आहे. मुंबईतील तिकीट निरीक्षक सुनील नैनानी यांनी २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात १.९२ कोटींचा दंड वसूल करत सर्वाधिक दंड वसूल करणाऱ्या तिकीट तपासणीसाचा बहुमान पटकावला. मध्य रेल्वेच्या उपनगरीय, मेल-एक्स्प्रेस, प्रवासी सेवा आणि विशेष गाड्यांमध्ये तिकीट तपासणी करण्यात येत आहे. यामुळे तिकीट काढूनच प्रवास करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## एक्स्प्रेसची साखळी खेचणाऱ्या महिलेवर गुन्हा

### कल्याण स्थानकांतील प्रकार



**■ठाणे, नितीन देवळेकर,**
कल्याण स्थानकातून जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्या फलाटावर जिथे थांबणे अपेक्षित असते, तिथे त्या अनेकदा थांबत नाहीत. इंडिकेटरवर दाखवलेल्या जागी बोगी येत नसल्याने प्रवाशांची धावपळ होते. असाच एक प्रकार कल्याण स्थानकात घडला. अशा धावपळीने एका प्रवासी महिलेने एक्स्प्रेसची साखळी ओढल्याने या महिलेला गाडीतून उतरवण्यात आले. यावेळी तिने गोंधळ घातल्याने तिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबईहून उत्तर प्रदेशकडे जाणाऱ्या एलटीटी गोरखपूर एक्स्प्रेसने जाण्यासाठी एक महिला आई-वडील आणि दोन मुलांसह निघाली होती. इंडिकेटरवर दाखवलेल्या ठिकाणी हे कुटुंब थांबले होते. मात्र, प्रत्यक्षात गाडीची बोगी मागे राहिल्याने ते सर्वजण सामान घेऊन पळाले. मात्र, गाडी सुटण्याच्या भीतीने महिलेने दीड वर्षांच्या मुलाला कडेवर घेऊन समोर दिसेल, त्या बोगीत प्रवेश केला, तर तिचे वडील तिच्या तीन वर्षांच्या मुलीला घेऊन बोगीपर्यंत धावत गेले. ते गाडीत चढले किंवा नाही हे कळण्याआधीच गाडी सुटल्याने ती घाबरली आणि तिने गाडीची साखळी ओढली. यामुळे गाडी थांबल्याने आरपीएफ आणि रेल्वे पोलिस बोगीत दाखल झाले. साखळी ओढल्याने लोकल विलंबाचा ठपका ठेवत या महिलेला खाली उतरवण्यात आले. मात्र, वडील आणि मुलगी गाडीतच राहिली. यानंतर या महिलेने त्यांना गाडीतून उतरवण्याची मागणी केली. मात्र, पोलिस त्याकडे लक्ष देत नसल्याने तिने स्थानकात वाद घालत गोंधळ घातला. यामुळे पोलिसांनी तिला ताब्यात घेतले. यादरम्यान या महिलेने वडिलांशी संपर्क करत, त्यांना कसारा स्थानकात उतरण्यास सांगितले. आता पोलिसांनी तिच्याविरोधात गुन्हा दाखल केला असला, तरी रेल्वे प्रशासनाच्या चुकीमुळे आपले हजारो रुपयाचे वातानुकुलीत प्रवासाचे तिकीट वाया गेल्याने झालेला भुर्दंड कोण भरून देणार, असा प्रश्न या महिलेने केला आहे.

## बर्फीवाला पुलाचा 'पार्किंग'साठी वापर, क्रिकेट खेळण्यासाठी, कपडे वाळत घालण्यासाठी उपयोग

**■मुंबई, यश सावंत :**
अंधेरी पूर्व आणि पश्चिम परिसर जोडणारे गोपाळकृष्ण गोखले पूल आणि सी. डी. बर्फीवाला पूल यांची जोडणी विविध कारणांमुळे रखडली आहे. त्यामुळे सध्या या बर्फीवाला पुलाकडे जाणाऱ्या मार्गाचा वापर उच्चभ्रू वस्तीतील रहिवाशांच्या गाड्या उभ्या करण्यासाठी करत आहेत. तसेच क्रिकेट खेळण्यासाठी, बेघरांना झोपण्यासाठी, तर कपडे वाळत घालण्यासाठी या पुलाच्या पोहोच रस्त्याचा वापर केला जात आहे. अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा गोखले पूल धोकादायक ठरल्यामुळे नोव्हेंबर २०२२ मध्ये वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. त्यानंतर या पुलाचे पाडकाम, बांधकाम सुरू झाले. गेली दोन वर्षे ते सुरू आहे. अजूनही हे काम पूर्ण होण्यास वेळ लागणार आहे. हा पूल बंद असल्यामुळे अंधेरी पश्चिमेला असलेला



जुना बर्फीवाला पुलही वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.गोखले पुलाची एक बाजू सुरू झाली असली, तरी सी. डी. बर्फीवाला पूल आणि गोखले पूल यांची पातळी नवीन बांधकामामुळे वरखाली झाली आहे, तसेच त्यात अंतर पडले आहे. त्यामुळे हे दोन पूल कसे जोडायचे याबाबत उच्चस्तरीय खल सुरू आहे. मात्र, या काळात बर्फीवाला पूल हा काही नागरिकांसाठी हक्काची जागा बनला आहे. या पुलाच्या पोहोच रस्त्याचा भाग हा या परिसरातील नागरिकांनी व्यापला आहे. या पुलाच्या पोहोचमार्गावर गाड्या, ट्रक उभे केले जातात, तर कधी परिसरातील मुले तेथे क्रिकेट खेळतात. आजूबाजूच्या झोपडपट्टीतील रहिवासी पुलाच्या कठड्यावर कपडे वाळत घालतात, उच्चभ्रू वसाहतींमधील रहिवाशांच्या मोटारगाड्यांसाठी हे हक्काचे वाहनतळ झाले आहे. तर जवळच असलेल्या चारचाकी गाडीच्या एका शोरुमच्या गाड्याही इथे उभ्या असतात. त्यामुळे हा एक वेगळाच त्रास या परिसरातील नागरिकांना होऊ लागला आहे. पुलाचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत हा त्रास आणि या मार्गाचे विद्रुपीकरण सुरू राहणार का असा सवाल अंधेरी लोखंडवाला रहिवासी संघटनेचे धवल शाह यांनी केला आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात ''रस्ता नाही तर मतदान नाही''



**■ठाणे, रोहित जैसवाल :**
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात सुमारे २५ हजार ठाणेकर नागरिकांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. ठाण्यातील रुस्तमजी अर्बेनिया गृहसंकुलातील रहिवासीयांनी एकत्र येत 'रस्ता नाही तर मतदान नाही' अशी भूमिका घेतली. त्यामुळे ऐन लोकसभा निवडणुकीच्या वेळी उमेदवारांची धाकधूक वाढणार आहे. ठाण्यातील साकेत पुलाजवळ रुस्तमजी अर्बेनिया नावाचे गृहसंकुल आहे. या गृहसंकुलामध्ये सुमारे २५ ते ३० मजल्यांच्या अनेक इमारती आहेत. घोडबंदरच्या तुलनेत ठाणे स्थानक, मुंबई नाशिक महामागार्पासून जवळचा भाग असल्याने २०१४ नंतर अनेकजण या गृहसंकुलामध्ये वास्तव्य करण्यास आले. सध्या या भागात साकेत कॉम्प्लेक्स आणि रुस्तमजी अर्बेनिया या दोन्ही गृहसंकुलाच्या सुमारे ५ हजार सदनिकाधारक असून, सुमारे २० ते २५ हजार नागरिक या भागात वास्तव्य करतात. या भागातून एक सेवारस्ता माजिवडा आणि राबोडीला जोडणारा केला जाणार आहे, असे सदनिका खरेदी करताना सदनिकाधारकांना सांगण्यात आले होते. मुंबई नाशिक महामार्ग आणि अंतर्गत रस्त्यांना गृहसंकुलाचा रस्ता जोडला जात असल्याने तसेच ठाण्यापासून जवळचा भाग असल्याने येथे सदनिका खरेदी केल्या. येथे मोठ्या प्रमाणात रहिवाशी वास्तव्यास येऊ लागल्याने ठाणे महापालिकेने साकेत ते ऋतु इस्टेटचा १५ मीटर रुंद सेवारस्ता तयार करण्याचे ठरले होते. विकास आराखड्यानुसार रस्ता तयार केला जाणार होता. मान्यता मिळून सुमारे आठ वर्षे उलटल्यानंतरही सेवारस्ता तयार करण्यासंदर्भात कोणतीही हालचाल प्रशासनाकडून झालेली नाही. त्यामुळे प्रवासात नागरिकांचा वेळ आणि पैसा या दोन्ही गोष्टींचा अपव्यय होत असल्याने रहिवासीयांनी थेट निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. येथील नागरिकांनी एकत्र येत 'रस्ता नाही तर मतदान नाही' अशी भूमिका घेतली.

## एसटी कर्मचाऱ्यांना मिळणार गारेगार पाणी

**■मुंबई,विशाल पाटील :**
एसटी कर्मचाऱ्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी एसटी महामंडळाच्या विविध विभागीय कार्यालयाने इनबिल्ट वॉटर कुलर व प्युरिफायरची कार्यवाही सुरूकेली आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांना शुद्ध गारेगार पाणी उपलब्ध होणार आहे. एका खाजगी कंपनीकडून इनबिल्ट वॉटर कुलर व प्युरिफायरचा खरेदी करण्यात येणार आहेत. इनबिल्ट वॉटर कुलर व प्युरिफायर स्थापितीकरणाची ठिकाणे व पत्ता हा विभागांमार्फत मागविण्यात आला होता, सर्व विभागांमार्फत वॉटर कुलरच्या स्थापितीकरणाविषयीची ठिकाणे ही प्राप्त झाली पुढील प्रक्रिया सुरूकरण्यात आली आहे.



मशिन स्थापितीकरण करण्यासाठी संबंधित अधिकारी म्हणजेच आगार व्यवस्थापक, विभाग नियंत्रक, यंत्र अभियंता (चा) यांनी जागा निश्चित करणे आवश्यक आहे. ही मशिन प्राधान्याने चालक वाहक व यांत्रिकी कर्मचारी यांच्या विश्रांती गृहात स्थापित केली जाणार आहे. या कामासाठी आवश्यक खर्च करण्याचे अधिकार विभाग नियंत्रक यांना असून त्यांनी त्यांच्या अधिकारात सदरचा खर्च केला जाणार आहे.

## प्रवाशांच्या मागणीनंतर नवी मुंबई मेट्रोची सिडकोने वाढवली वेळ

**■नवी मुंबई, भावना जैन :**
मेट्रो प्रवाशांच्या मागणीनंतर सिडको महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालकांनी नवी मुंबई मेट्रोच्या वेळेत वाढ केली आहे. सोमवारपासून वाढीव वेळेनुसार मेट्रो धावणार आहे. वाढलेल्या वेळेनुसार बेलापूर मेट्रोस्थानकातून एक तास तर पेणधर मेट्रो स्थानकातून अर्ध्या तासाची वेळ वाढवण्यात येणार असल्याचे सिडको मंडळाच्या जनसंपर्क विभागाने जाहीर केले. साडेचार महिन्यांपूर्वी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदीनी (ता.१७ नोव्हेंबर) नवी मुंबई मेट्रोची पहिली मार्गिका बेलापूर स्थानक ते पेणधर या पल्यावर धावली. रात्री १० वाजेपर्यंत अखेरची मेट्रो धावत असल्याने हार्बर मार्गे तळोजात येणाऱ्या प्रवाशांना खारघर रेल्वेस्थानकाबाहेरुन खासगी रिक्षा अथवा इको व्हॅनने प्रवास करावा लागत होता. या परिसरात पथदिवे अनेक ठिकाणी नसल्याने रात्रीचा प्रवास धोकादायक होता. मागील साडेचार महिन्यात साडेचार लाख प्रवाशांनी मेट्रोतून प्रवास केला आहे. सिडको महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्यासमोर



प्रवाशांची वाढीव वेळेची मागणी ठेवल्यानंतर त्यांनी तातडीने ही मान्य केल्याने प्रवाशांना आता रात्री अकरा वाजेपर्यंत बेलापूर ते पेणधर या मार्गावर सूरक्षित प्रवास करता येणार आहे. मेट्रोच्या प्रवाशांची प्रवासी दर भाडे कमी करण्याची मागणीविषयी सिडकोने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. नव्या वेळापत्रकानूसार बेलापूर मेट्रो स्थानक येथून सुटणाऱ्या मेट्रोच्या सेवा वेळेत एक तासांची तर पेणधर मेट्रो स्थानकातून सुटणाऱ्या मेट्रोच्या सेवा वेळेत अर्ध्या तासाची वाढ करण्यात येणार आहे. आठवड्यातील सर्व दिवशी वाढीव सेवा वेळेनुसार मेट्रो धावणार आहे. नवी मुंबई मेट्रो मार्ग क्रमांक १ बेलापूर ते पेणधर या पल्यावर धावणाऱ्या मेट्रोच्या सेवा वेळेमध्ये वाढ केल्यानंतर बेलापूर मेट्रो स्थानक येथून सकाळी सहा वाजता पहिली मेट्रो पेणधरच्या दिशेने व पेणधर येथून बेलापूरच्या दिशेने रवाना होईल. बेलापूर मेट्रो स्थानक येथून शेवटची मेट्रो रात्री अकरा वाजता पेणधरच्या दिशेने रवाना होईल तर पेणधर मेट्रो स्थानक येथून शेवटची मेट्रो रात्री साडेदहा वाजता बेलापूरच्या दिशेने रवाना होईल.

//सुविचार 'भूतकाळ बदलला जाऊ शकत नाही, परंतु भविष्य आपल्या हातात आहे...' //

## त्वचा भाजल्यावर करा हे घरगुती उपाय...

**गरम पाणी पडल्याने किंवा पेटल्याने वा गरम भांड्याला हात लागल्याने आपण भाजले जातो. भाजल्यामुळे जखमही होते. कधी हे भाजणं साधं असतं तर कधी गंभीर रूप धारण करतं. जखम तीव्र, मध्यम किंवा तीव्र रक्तस्त्रावी असते. म्हणून भाजल्यानंतर ही काळजी घ्या :**

- जखमेवर बर्फ लावण्याऐवजी भाजल्याबरोबर त्यावर पाण्याची धार सोडा. हे शक्य नसल्यास एका भांड्यात थंड पाणी घेऊन त्यात जखमी भाग बुडवून ठेवा.
- तूप, तेल, टूथपेस्ट किंवा कोणताही तरल पदार्थ जखमेवर लावू नये. त्याऐवजी एखादं अँटीबायोटिक क्रीम लावावं.
- भाजलेल्या भागाला कापूस किंवा कापडाने झाकू नये.
- जखमेवरील फोड फोडू नये.

**काही घरगुती उपाय**

- कोरफडीच्या गरामध्ये जखम बरी करण्याचे गुणधर्म असतात. जखमेमुळे त्वचेचा दाह होत असेल तर हा गर त्यावर लावावा.
- फ्रीजमध्ये ठेवलेली टी बॅग काही काळ जखमेवर दाबून धरा. याने वेदना आणि दाह कमी होईल. गरमऐवजी गार पाण्याने अंघोळ करा.



## केसांसाठी फायदेशीर आहे गुलाबपाणी

**आजकाल प्रदूषणामुळे केस कोरडे आणि निर्जीव झाले आहेत. अशा परिस्थितीत त्यांची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत केसांसाठी नैसर्गिक घटकांचा वापर केला जाऊ शकतो, ज्यामध्ये गुलाब पाण्याला देखील एक नाव आहे. होय, तुम्हा सर्वांना हे जाणून आश्चर्य वाटेल की त्वचेसोबतच केसांसाठी गुलाब पाण्याचे अनेक फायदे आहेत. होय, गुलाबपाणी केसांना चांगले बनवते आणि त्याच वेळी त्यांचा पोत सुधारण्यास मदत करते. त्याच वेळी, ते तुमच्या केसांना एक नैसर्गिक सुगंध देते, ज्यामुळे केसांचा वास ओसरतो. आता आम्ही तुम्हाला केसांमध्ये गुलाबपाणी कसे वापरावे ते सांगत आहोत.**



**तेलकट टाळूसाठी**

गुलाबपाणी तुमच्या केसांना तेलकट होण्यापासून रोखते, म्हणजेच तुमच्या टाळूतून बाहेर पडणारे अतिरिक्त तेल ते नियंत्रित करू शकते. होय, गुलाब पाण्याचे पीएच स्कॅल्पचे पीएच नियंत्रित करते आणि अतिरिक्त तेल नियंत्रित करण्यास मदत करते.

**केसांच्या वाढीस मदत करते**

गुलाबपाण्यात भरपूर जीवनसत्त्वे अ, उ, ऊ ए आणि ई असतात आणि हे सर्व आपल्या केसांच्या, त्वचेच्या आणि शरीराच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. गुलाब पाण्याची थेट टाळूवर फवारणी केली जाऊ शकते कारण ही जीवनसत्त्वे त्वरित त्वचेत आणि केसांच्या कूपांमध्ये खोलवर प्रवेश करतात, त्यांच्या गुणधर्मांसह त्यांचे पोषण करतात आणि केसांची वाढ रोखणारी कमतरता भरून काढतात.



**केसांच्या कंडिशनसाठी**

गुलाब पाण्यामध्ये मॉइश्चरायझिंग गुणधर्म असतात, त्यामुळे कोरड्या त्वचेच्या लोकांनी ते वापरावे. तुमचे केस कोरडे होऊ लागतात तेव्हा ते प्रभावी ठरते. यासाठी स्प्रे बॉटलमध्ये गुलाबपाणी टाकून केसांवर स्प्रे करा.

**कोंडासाठी**

केसांमधला कोंडा दूर करण्यासाठी गुलाबपाणी देखील वापरता येते. कोंडा नियंत्रित करण्यासाठी गुलाबपाणी महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

**केस मजबूत करते**

गुलाब पाण्यामध्ये असलेले व्हिटॅमिन, अँटीऑक्सिडंट्स, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्मांमुळे ते प्रत्येक केस मजबूत करते. होय, हे केवळ केसांच्या वाढीस मदत करत नाही तर केस गळणे आणि तुटणे देखील प्रतिबंधित करते.

**कोरडेपणा दूर करण्यासाठी**


कोरडे आणि कुरळे केस असलेल्या लोकांसाठी गुलाबजल खूप चांगले मानले जाते. वास्तविक, तुमच्या केसांमध्ये नियमितपणे गुलाबपाणी वापरल्याने केसांचा कोरडेपणा कमी होतो.

**केसांना मॉइश्चरायझ करण्यासाठी**

गुलाबपाणी वापरल्याने केसांमधील आर्द्रता टिकून राहण्यास मदत होते.

## प्रदूषित हवेमुळे मधुमेहाचा धोका

**अधिक** काळ प्रदूषित हवेत श्वास घेतल्याने मधुमेहाचा धोका वाढत असल्याचे समोर आले आहे. चीनमध्ये नुकत्याच एका अभ्यासातून याबाबत माहिती समोर आली आहे. मधुमेहामुळे जगभरात आरोग्यासंबंधीही समस्या वाढत आहेत. यामुळे आर्थिक ओझेही वाढत आहे. जगभरात चीनमध्ये मधुमेहाचे सर्वात अधिक रुग्ण आहेत. चीनमधील सरकारी एजन्सी शिन्हुआने केलेल्या अभ्यासातून विकसनशील देशांत वायू प्रदूषण आणि मधुमेहातील संबंधांबद्दलची माहिती दिली गेली आहे. पीएम २.५ हे कण वायू प्रदूषक असतात. या कणांच्या संख्येत वाढ झाल्याने आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होतो. पीएम २.५ डोळ्यांनाही न दिसणारे अतिसूक्ष्म कण असतात. या हानीकारक कणांच्या अधिक संपर्कात आल्यास



मधुमेह होण्याची शक्यता असते. चायनीज ॲकॅडमी ऑफ मेडिकल सायन्सेस फुवई रुग्णालयाचे संशोधक आणि अमेरिकेतील एमरॉय विश्वविद्यालय यांनी केलेल्या एकत्रितपणे केलेल्या अभ्यासातून पीएम २.५च्या हानीकारक सूक्ष्म कणांच्या संपर्कात राहिल्याने मधुमेह होत असल्याचे सांगितले.

## झोप म्हणजे काय? ती कशी येते?

### जाणून घ्या झोपेसंदर्भातील अनेक प्रश्नांची उत्तरे

**सुदृढ आरोग्य आणि उत्तम काम करण्यासाठी शरीराला पुरेशी झोप आवश्यक असते. बदललेल्या जीवन पद्धतीमुळे तरुणाईला अपुरी झोप ही भेडसावणारी समस्या आहे. सर्वसाधारणपणे रात्रीची ६ ते ८ तास झोप घेण्याचा सल्ला दिला जातो. मात्र कामाच्या व्यग्र वेळा, अतिरिक्त ताण, स्पर्धा आणि बदललेल्या जीवनपद्धतीमध्ये रात्रीच्या वेळी ६ ते ८ तास झोप घेणे शक्य होत नाही. अशा वेळी पावर नॅप किंवा काही मिनिटांची डुलकी मानसिक ताण कमी करण्यास मदत करते.**

**झोप कशी येते?**

अनेकदा कामाच्या वेळांप्रमाणे आपल्या दैनंदिन जीवनात बदल होत असतो. अनेकदा झोपण्याची संधी मिळाल्यावर भरपूर झोप काढण्याची मानसिकता असते. मात्र असे न करता शरीराला आवश्यक तितकीच झोप घ्यावी. जास्त वेळ झोपल्यास कंटाळलेपणा किंवा आळस भरण्याची शक्यता असते. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी जास्त वेळ झोपण्याचे टाळावे.

**झोप म्हणजे काय?**

शरीराच्या इतर क्रियांप्रमाणेच झोप ही क्रिया आहे. मानेच्या भागातील पेशींमध्ये झोपेचे संकेत निर्माण होतात. तेथून मज्जारज्जूद्वारे शरीरातील सर्व अवयवांना मंदावण्याचे संकेत जातात. मेंदूच्या इतर भागांनाही हे संकेत जातात. त्यानंतर झोपेचा पहिला प्रकार म्हणजे 'स्लो वेव स्लीप'ची सुरुवात होते. साधारण तासाभराने दुसरा प्रकार सुरू होतो. यामध्ये डोळ्यांची बुब्बुळे हलतात म्हणून त्याला 'रॅपिड आय मूव्हमेंट' किंवा 'आरईएम' म्हणतात. यादरम्यान मांसपेशीतील ताण वाढतो आणि शरीराच्या काही हालचाली होतात. या झोपेच्या टप्प्यात शरीर आणि अवयव नेहमीपेक्षा जास्त उत्तेजित होतात. हा टप्पा मेंदूच्या आरामासाठी महत्त्वाचा असतो. रात्रभर हे दोन प्रकार आलटून-पालटून घडतात. स्लो वेवचा कालावधी कमी होत जातो आणि आरईएमचा वाढत जातो.

**झोपेतील नैसर्गिक बदल कोणते?**

काही व्यक्तींना तीन ते चार तास, तर काहींना नऊ ते दहा तास झोप लागते. या टोकाच्या गरजा क्वचित असतात, पण त्या सातत्याने लहानपणापासून दिसून येतात. काही व्यक्ती सूर्यास्ताबरोबर झोपतात आणि सूर्योदयाच्या आधी उठतात, तर काही मध्यरात्रीनंतर झोपून सकाळी उशिरा उठतात. काही व्यक्तींना दुपारी झोपावे लागते. झोपेत बडबडणे, चालणे, दात खाणे, स्वप्न पाहणे हे सर्व कमी-जास्त प्रमाणात होत असते. नवजात शिशु दिवसभर झोपत असतो. साधारण तीन ते पाच महिन्यांमध्ये ते रात्री जास्त व दिवसा कमी झोपू लागते. तीन वर्षांचे होईपर्यंत मुलांना दिवसभरात दोन तीन डुलक्या व रात्री जास्त वेळेची झोप लागते. शाळेतील मुलांना सात ते नऊ तास झोप लागते. पौगंडावस्थेत झोपेची गरज आणखीनच वाढते. त्यानंतर प्रौढपणात सहा ते आठ तास झोप पुरते. वृद्धपणी झोपेचे तास तेवढेच राहतात, मात्र झोपेतून सतत जाग येते आणि दिवसा डुलक्या येऊ लागतात.



**झोपेचा त्रास म्हणजे काय ?**

झोप चांगली येते की नाही हे फक्त संबंधित व्यक्तीच सांगू शकते. व्यक्ती पलंगावर डोळे मिटून पडलेली असते म्हणून त्यांना झोपेच्या तक्रारी नसतात, असे नाही. झोपेच्या त्रासाची अनेक कारणे असतात. बहुतेक वेळेला झोप कशी असावी व ती कशी सांभाळावी हे माहिती नसल्याने झोपेच्या तक्रारी निर्माण होतात. झोपेच्या तक्रारींचे दुसरे मोठे कारण म्हणजे मेंदूचे आणि मानसिक आजार, शारीरिक आजार आणि परिसरातील गोंधळ. यामुळे लहान मुलांनाही झोपेच्या तक्रारी उद्भवतात.

**झोपेच्या त्रासावर उपाय काय ?**


झोप कमी किंवा जास्त करण्यासाठी किंवा त्याची वेळ बदलण्यासाठी कुठलीही गोळी, काढा किंवा अमली पदार्थाचा वापर करू नये. झोपेची तक्रार असली तर आपली अपेक्षा आणि नैसर्गिक झोपेबद्दलची माहिती योग्य आहे का, ते तपासून पाहा. लहानपणापासूनच्या झोपेच्या प्रकृतीप्रमाणे दिनक्रम नियोजित करा. महत्त्वाकांक्षा किंवा इतरांशी स्पर्धा करण्यासाठी झोपेची ठेवण बदलू नका. झोपेची जागा शांत आणि आरामदायी असली पाहिजे. झोपेच्या दोन तास आधी व्यायाम, जेवण, मनःस्ताप होईल असे वाचन किंवा चर्चा, चहा-कॉफी आणि अमली पदार्थ टाळा. टीव्ही, मोबाइलपासून किमान तासभर दूर राहा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे झोप कधीही लागली तरी विशिष्ट वेळेलाच उठण्याची सवय करा. त्यामुळे चांगली झोप सातत्याने येते.

**पॉवर नॅप**

एक छोटी डुलकी किंवा पावर नॅप मेंदू ताजा तरतरीत करणारी असते. मात्र ही डुलकी १५ ते २० मिनिटांची असावी. पॉवर नॅपमध्ये काही काळ विचार बंद करण्याची क्रिया घडत असते. रात्रीची झोप ही दीर्घ तासांची असते. त्यामुळे अनेकदा सकाळी आळसटल्यासारखे वाटते. मात्र पॉवर नॅपमुळे तरतरी येते. दिवसातील कामाच्या ताणामुळे थकवा आल्यास किंवा आळसटल्यासारखे वाटत असेल तर पॉवर नॅप घ्यायला हरकत नाही. यामुळे शरीर नैसर्गिकरीत्या जी झोपेची किंवा आरामाची मागणी करत असते ती पूर्ण होते.

## स्वातंत्र्यवीर सावरकर चित्रपटाने १५ व्या दिवशी कमावले ४६ लाख, एकूण कलेक्शन जाणून घ्या

रणदीप हुड्डाची मुख्य भूमिका असलेला 'स्वातंत्र्य वीर सावरकर' चित्रपट सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होऊन दोन आठवडे झाले आहे. हा चित्रपट हिंदी व मराठी भाषेत २२ मार्च रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. १५ दिवसांनंतर या चित्रपटाचं बॉक्स ऑफिस कलेक्शन किती झालं आहे, या चित्रपटाने एकूण किती कमाई केली ते जाणून घेऊयात. 'स्वातंत्र्य वीर सावरकर' चित्रपटाने पहिल्या दिवशी २.९ कोटी रुपये कमामवले होते, त्यात १.४ हिंदी तर १.५ मराठीतून आले होते. दुसऱ्या दिवशी २.२५ कोटी, तिसऱ्या दिवशी २.७ कोटी, चौथ्या दिवशी २.१५ कोटी, पाचव्या दिवशी १.०५ कोटी,




सहाव्या दिवशी १ कोटी, सातव्या दिवशी १.१५ कोटी कमावले. दुसऱ्या आठवड्यात म्हणजेच आठव्या दिवशी चित्रपटाने १.१ कोटी, नवव्या दिवशी १.५ कोटी, १० व्या दिवशी १.७५ कोटी, ११ व्या दिवशी ६० लाख, १२ व्या दिवशी ५० लाख, १३ व्या दिवशी ५० लाख आणि १४ व्या दिवशी चित्रपटाने ४५ लाख व १५ व्या दिवशी ४६ लाख रुपयांची कमाई केली आहे. चित्रपटाचं दोन आठवड्यातील एकूण कलेक्शन १८.२१ कोटी रुपये झालं आहे. 'स्वातंत्र्य वीर सावरकर' चित्रपटातून रणदीप हुड्डाने दिग्दर्शनात पदार्पण केलं आहे. यात त्याच्याशिवाय अंकिता लोखंडे व अमित सियाल यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. या चित्रपटात वीर सावरकर यांचा जीवनप्रवास दाखविण्यात आला आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | | 3 | | 1 | 4 | 6 | | |
| | | | 7 | | 9 | | 8 | |
| | | 8 | 3 | | | | | 1 |
| 5 | | 9 | | | | | 4 | |
| | | | | 2 | | 9 | 1 | 6 |
| 2 | | | 9 | | 8 | | | 7 |
| | 8 | 7 | | | | 4 | 5 | |
| 9 | 1 | | | 3 | | 2 | | |
| 3 | | | | | | | | 9 |

### उत्तर सुडोकू -४९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4 | 5 | 7 | 9 | 6 | 8 | 2 | 3 |
| 6 | 9 | 8 | 2 | 1 | 3 | 5 | 4 | 7 |
| 3 | 7 | 2 | 8 | 4 | 5 | 9 | 6 | 1 |
| 7 | 8 | 3 | 5 | 2 | 1 | 6 | 9 | 4 |
| 4 | 2 | 6 | 9 | 8 | 7 | 1 | 3 | 5 |
| 9 | 5 | 1 | 3 | 6 | 4 | 2 | 7 | 8 |
| 5 | 6 | 4 | 1 | 7 | 9 | 3 | 8 | 2 |
| 2 | 1 | 9 | 4 | 3 | 8 | 7 | 5 | 6 |
| 8 | 3 | 7 | 6 | 5 | 2 | 4 | 1 | 9 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## रामनवमी कधी आहे? जाणून घ्या, तारीख, पूजा विधी आणि महत्त्व

चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षाच्या नवव्या तिथीला रामनवमी साजरा केली जातो. रामनवमी म्हणजे प्रभु रामाचा जन्मोत्सव. चला जाणून घेऊया यावर्षीची रामनवमी कधी आहे. तसेच मुहूर्त आणि पूजाविधी.


रामनवमीचे पर्व भगवान श्रीरामाच्या जन्मोत्सवाच्या रूपात साजरा केले जाते. वाल्मिकी रामायणानुसार भगवान श्री रामाचा जन्म चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षाच्या नवमीला, कर्क लग्नात आणि अभिजात मुहूर्तावर झाला होता. रामनवमीचा चैत्र महिन्यातील नवरात्रीचा अखेरचा दिवस असतो. रामनवमी फक्त भारताच नाही तर जगभरात साजरी केली जाते. या वेळी नवरात्रीची सुरुवात ९ एप्रिलला होत आहे. चला जाणून घेऊया रामनवमी कधी आहे?

**रामनवमी केव्हा आहे?**

पंचांगानुसार चैत्र महिन्यातील नवमी तिथीचा प्रारंभ १६ एप्रिलला मंगळवारी दुपारी १ वाजून २३ मिनिटांनी होईल आणि नवमी तिथी १७ जानेवारीला दुपारी ३ वाजून १५ मिनिटांपर्यंत असेल. उदया तिथीत नवमी तिथी असल्याने रामनवमी १७ एप्रिलला साजरी होईल. १७ एप्रिलला पूर्ण दिवस रवी योग असणार आहे. भगवान श्रीरामाची कृपा व्हावी यासाठी या दिवशी रामायण पाठ आणि राम रक्षा स्तोत्र यांचे पठण करावे. असे केल्याने जीवनात सुखसमृद्धी राहील. या दिवशी भगवान श्रीरामाच्या मंदिरात जाऊन तिथे पिवळ्या रंगाचे वस्त्र अर्पण करावे. तसेच पिवळ्या रंगाच्या फुलांचा हार अर्पण करावा.

**घरी रामनवमीची पूजा कशी करावी?**

- जर मंदिरात जाणे शक्य नसेल तर घरीही पूजा करता येते.
- पूजेसाठी सर्वात आधी लाकडी चौरंग घ्या.
- यावर लाल रंगाचे वस्त्र ठेवा.
- त्यानंतर भगवान श्रीराम, लक्ष्मण, माता सीता, हनुमान यांच्या मूर्ती गंगाजलाने शुद्ध करून चौरंगावर स्थापित कराव्यात.
- मग चंदनाचा टिळा लावावा.
- त्यानंतर अक्षता, फूल अशी पूजेची सामग्री अपर्ण करावी.
- मग तुपाचा दिवास लावून रामरक्षा स्तोत्र, श्रीराम चालिसा आणि रामायणातील श्लोकांचे पठण करावे.
- तुमची इच्छा असेल तर या दिवशी सुंदर कांडमधील पाठ आणि हनुमान चालिसा यांचे पठणही करू शकता.



## दिनविशेष

### ७ एप्रिल

- १८७५: आर्य समाजाची स्थापना झाली.
- १९०६: माऊंट व्हेसुव्हियस ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यामुळे नेपल्स शहर बेचिराख झाले.
- १९३९: दुसरे महायुद्ध झ्र इटालीने अल्बेनिया पादाक्रांत केले.
- १९४०: पोस्टाच्या तिकिटावर चित्र असणारे बुकर टी. वॉशिंग्टन हे पहिले कृष्णवर्णीय अमेरिकन ठरले.
- १९४८: जागतिक आरोग्य संघटना (हल्ड) स्थापना झाली.
- १९८९: लठ्ठा नावाच्या विषारी दारूने बडोदा येथे १२८ जणांचा बळी गेला.
- १९९६: श्रीलंकेचे क्रिकेटपटू फलंदाज सनथ जयसूर्या यांनी सिंगरकरंडक स्पर्धेत १७ चेंडूंत अर्धशतक करण्याचा विश्वविक्रम केला.
- १५०६: ख्रिस्ती धर्मप्रसारक सेंट फ्रान्सिस झेविअर यांचा जन्म. (मृत्यू: ३ डिसेंबर १५५२ झ्र साओ जोआओ, चीन)
- १७७०: स्वच्छंदतावादाचे प्रणेते आणि इंग्लिश कवी विल्यम वर्डस्वर्थ यांचा जन्म. (मृत्यू: २३ एप्रिल १८५०)
- १८६०: केलॉग्ज चे मालक विल केलॉग यांचा जन्म. (मृत्यू: ६ ऑक्टोबर १९५१)
- १८९१: जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार सर डेविड लो यांचा जन्म. (मृत्यू: १९ सप्टेंबर १९६३ झ्र लंडन, इंग्लंड)
- १९२०: भारतरत्न सतार वादक पंडित रविशंकर यांचा जन्म. (मृत्यू: १२ डिसेंबर २०१२)
- १९२५: केंद्रीय कृषिमंत्री व कामगार नेते चतुरानन मिश्रा यांचा जन्म. (मृत्यू: २ जुलै २०११)
- १९३८: भाजपाचे लोकसभा सदस्य काशीराम राणा यांचा जन्म. (मृत्यू: ३१ ऑगस्ट २०१२)
- १९४२: हिंदी चित्रपट अभिनेते जितेंद्र यांचा जन्म.
- १९५४: हाँग काँगचे प्रसिद्ध चित्रपट अभिनेते जॅकी चेन यांचा जन्म.
- १९८२: भारतीय वंशाचा अमेरिकन व्यावसायिक कुस्तीगीर सोंजय दत्त यांचा जन्म
- १४९८: फ्रान्सचा राजा चार्ल्स (आठवा) यांचे निधन. (जन्म: ३० जून १४७०)
- १९३५: भारतीय शास्त्रज्ञ डॉ. शंकर आबाजी भिसे यांचे निधन. (जन्म: २९ एप्रिल १८६७)
- १९४७: फोर्ड मोटर कंपनीचे संस्थापक हेन्री फोर्ड यांचे निधन. (जन्म: ३० जुलै १८६३)
- १९७७: चित्रपट अभिनेते, लेखक आणि गीतकार राजा बढे यांचे निधन. (जन्म: १ फेब्रुवारी १९१२)
- २००१: जगप्रसिद्ध जैवभौतिक शास्त्रज्ञ गोपालसमुद्रम नारायण अय्यर रामचंद्रन तथा डॉ. जी. एन. रामचंद्रन यांचे निधन. (जन्म: ८ ऑक्टोबर १९२२ झ्र एनार्कुलम, केरळ)
- २००४: प्रसिद्ध ओडिसी नर्तक केलुचरण महापात्रा यांचे निधन. (जन्म: ८ जानेवारी १९२६)

## भविष्य

**मेष** — असुरक्षितता अथवा आत्मविस्मृतीच्या भावनेमुळे चक्कर येईल. तुमच्या नियमित कष्टांचे आज चांगल चीज होईल.

**वृषभ** — विश्रांती घ्या आणि कामात व्यग्र असताना मधेमधे थोडा आराम करा. वाईट सवयी तुम्हाला जडविण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहा.

**मिथुन** — चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. तुमच्या पालकांसोबत तुमचा आनंद वाटा.

**कर्क** — तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. मित्रांच्या मदतीमुळे आर्थिक अडचण सुकर होईल.

**सिंह** — तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे अशा विशेष व्यक्तीची ओळख मित्रामुळे होऊ शकते. किरकोळ आणि ठोक व्यापाऱ्यांसाठी चांगला दिवस.

**कन्या** — अलिकडे घडलेल्या घटनांमुळे तुमचे चित्त विचलित होईल. ध्यानधारणा आणि योगासने यामुळे तुम्हाला शारीरिक व अध्यात्मिक फायदा होईल. आज कार्य क्षेत्रात तुमच्या कुणी जुन्या कामाचे कौतुक होऊ शकते.

**तुला** — भावनिकदृष्ट्या तुम्ही स्थिर व्यक्ती नाही आहात, त्यामुळे इतरांसमोर कसे वागता बोलता त्याबाबत सावध असणे योग्य ठरेल. स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल.

**वृश्चिक** — विनाकारण स्वतःची निंदा करून तुमचा उत्साह घालवू नका. दिवसाच्या उत्तरार्धात आराम करा. कामातील दबावामुळे मानसिक खळबळ आणि अशांती वाढेल.

**धनु** — आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. तुम्हाला जिथे बोलण्याची गरज नाही तिथे तुम्ही बोलू नका. जबरदस्ती बोलण्याच्या कारणाने तुम्ही स्वतःला चिंतेत टाकू शकतात.

**मकर** — तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकते. तुमचे हसतमुख वागणे कुटुंब जीवन प्रकाशमान करतील. शक्य असेल तर लांबचा प्रवास टाळणे चांगले.

**कुंभ** — तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा. तुम्हाला एकाकी वाटेल तेव्हा तुम्ही तुमच्या कुटूंबियांची मदत घ्या. त्यामुळे नैराश्यापासून तुमचा बचाव होईल. परिणामी सुयोग्य, संयुक्तिक निर्णय घेण्यास तुम्हाला मदत होईल.

**मीन** — आजवर दबून राहीलेले सुप्त प्रश्न उभे राहील्यामुळे मानसिक तणाव येऊ शकतो. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल - राहिलेली देणी परत मिळवाल - किंवा नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल. कुटुंबाच्या कल्याणासाठी मेहनत करा.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# बाबा वाक्यं प्रमाणम्?

एकीकडे, पंतप्रधान नरेंद्र मोदी कोरोनाची देशांतर्गत लस लवकर तयार व्हावी, यासाठी सगळ्या यंत्रणांना युद्धस्तरावर कामाला लावत होते; भारतीय लस अनेक देशांना विनामूल्य पोहोचवत होते आणि दुसरीकडे बाबा आणि आचार्य केवळ काही औषधे घेऊन करोना बरा होऊ शकतो, असा दावा करीत होते. 'पतंजली आयुर्वेद'चे संस्थापक बाबा रामदेव, आचार्य बालकृष्ण आणि इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) यांचा वाद आता निर्णायक टप्प्यावर आला आहे. या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने बाबा रामदेव यांनी स्वतः उपस्थित राहून केलेली क्षमायाचना नामंजूर केली. खंडपीठाने आठ दिवसांत बाबा आणि आचार्यांकडे नवे प्रतिज्ञापत्र मागितले असून खंडपीठाचा एकूण रोख व उद्वेग पाहता हे प्रकरण बाबांना जड जाण्याची लक्षणे आहेत. मुळात उत्तम योगासन गुरू असणाऱ्या रामदेव यांच्या 'पतंजली' उत्पादनांबाबत गेल्या काही वर्षांत वारंवार प्रश्न उपस्थित केले गेले. त्यांच्या महाकाय व्यवसायाने बराच चढ-उतारही अनुभवला आहे. सारे जग कोरोनाशी झुंज देत असताना पंतजली आयुर्वेदने प्रकाशित केलेल्या जाहिराती आणि त्यातील दावे यामुळे आयएमएने हा खटला गुदरला. एका जाहिरातीत 'पतंजली'ने कोरोनिल या गोळ्या आणि अणू तेल यांच्यामुळे तीन ते १५ दिवसांत करोनाचे रिपोर्ट निगेटिव्ह आल्याचा दावा केला होता. काही जाहिरातींचा रोख कोरोना लसीच्या विरोधातही होता. एकीकडे, पंतप्रधान नरेंद्र मोदी करोनाची देशांतर्गत लस लवकर तयार व्हावी, यासाठी सगळ्या यंत्रणांना युद्धस्तरावर कामाला लावत होते; भारतीय लस अनेक देशांना विनामूल्य पोहोचवत होते आणि दुसरीकडे बाबा आणि आचार्य केवळ काही औषधे घेऊन करोना बरा होऊ शकतो, असा दावा करीत होते. असे निव्वळ आयुर्वेदिक उपचारांनी करोनारुग्ण बरे झाले असतील; तर त्यांचे सारे केस पेपर्स, उपचार आणि अशा रुग्णांचे वेळोवेळचे परीक्षण व चाचण्या यांचे काटेकोर तपशील सुप्रीम कोर्टाला सादर करणे आवश्यक होते; तसे ते केले नसतील तर अशा दाव्यांना काहीही अर्थ राहात नाही. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण आल्यावर काही प्रतिबंधात्मक आदेश देण्यात आले होते. असे असताना बाबा रामदेव यांनी पत्रकार परिषद का घेतली, अशी कडक विचारणा न्या. हिमा कोहली आणि न्या. असनुद्दीन अमानुल्ला यांनी केली आहे. या परिषदेत बाबांनी बऱ्याच रुग्णांना समक्ष हजर केले होते आणि त्यांचे कोणकोणते विकार आयुवेर्दाने बरे झाले, याची जंत्री पत्रकारांना सादर केली होती. हा खटला म्हणजे साऱ्या आयुर्वेदावरचा हल्ला आहे आणि हा एका मोठ्या जागतिक कारस्थानाचा भाग आहे; असाही त्यांचा सूर होता. बाबांचे हे म्हणणे क्षणभर मान्य केले तर मग जाहिराती देताना, दावे करताना किंवा रुग्णोपचारांचे रेकॉर्ड ठेवताना 'पतंजली'ने किती डोळ्यांत तेल घालून काम करायला हवे होते, हेच अधोरेखित होते. आपण जाहिराती देऊन केलेले दावे जर सिद्ध करता आले नाहीत, तर प्रदीर्घ व गौरवास्पद परंपरा असणाऱ्या आयुर्वेदाचे नाव खराब होईल, याचे भान 'पतंजली'ने बाळगले नाही. 'कोरोना'चा कहर चालू असताना आयुर्वेदातील नेमक्या कोणत्या औषधांचा वापर करून करोनाच्या लक्षणांवर मात करता येईल, याचे संशोधन अनेक तरुण संशोधकांनी केले, त्याचे काही निष्कर्षही सर्वांसमोर ठेवले. ते महाजालातही उपलब्ध आहेत. मात्र, त्यातही आयुवेर्दाने कोरोना समूळ नष्ट करण्याचे अतिरंजित दावे नाहीत. विज्ञानाला अनुसरणारे असे दावे करत नाहीत. सारे जग करोनाग्रस्त असताना बेछूट जाहिरातबाजी केल्याची किंमत आता बाबा-आचार्यांना मोजावी लागते आहे.सगळ्या जगाचे समग्र नियमन, नियंत्रण करणारी 'बाजारपेठ' ही आज सगळ्यांत बलाढ्य शक्ती आहे. करोनाचा एकूण उदयास्त आणि त्याने उडविलेला हाहाकार याचे विविधांगी 'महाभारत' लिहिता येईल; तसे ते लिहिले जातेही आहे. मात्र, 'सगळे जग चूक आहे आणि आम्ही मात्र सत्याचे पुजारी,' असे कुणी म्हणत असेल तर ते सिद्ध करावे लागते. कुणालाही 'विश्वामित्र' बनून स्वतंत्र सृष्टी व तिचे स्वतंत्र नियम असे करता येणार नाही. आपले म्हणणे सध्याच्या चौकटीतच खरे करून दाखवावे लागेल. 'शास्त्र-काट्याची कसोटी' उत्तीर्ण व्हावी लागेल. तेथे नुसत्या भावना, इतिहासाच्या गप्पा आणि प्राचीन थोरवीची गौरवगीते पुरत नाहीत. या निमित्ताने भारताच्या समग्र आरोग्यचित्राकडे पाहण्याची गरज आहे. ते काम सर्वोच्च न्यायालयाचे नाही. मागे एका खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने आयुर्वेदिक डॉक्टरांना ॲलोपॅथिक डॉक्टरांच्या समकक्ष मानता येणार नाही; कारण त्यांना आणीबाणीच्या प्रसंगी शस्त्रक्रियांचे निर्णय व कृती तातडीने करावी लागत नाही,' असे म्हटले होते. आधुनिक वैद्यकाचा प्रयोगशाळा व शल्यचिकित्सेतील संशोधनाचा विलक्षण प्रवास आणि या दोन्हींचे रोजच्या जीवनातील वाजवी-अवाजवी बाजारपेठीय उपयोजन यांना एका तराजूत तोलता येणार नाही. बाबा रामदेव ॲलोपॅथीवर टीका करताना आणि आयुर्वेदाच्या सावलीत स्वतःचे समर्थन करताना ही चूक करीत आहेत. कोणत्याही शास्त्रात 'बाबा वाक्यं प्रमाणम्' असे नसते. रामदेव बाबा आणि आचार्य बालकृष्ण यांना हे आधीच कळते, तर ही आफत ना येती.

# अवकाळी व कोरड्या दुष्काळाशी सामना



बदलत्या हवामानामुळे भविष्यात ओला व कोरड्या दुष्काळाची समस्या तीव्र होत जाणार, अशी शक्यता अमेरिका, युरोपसह जगभरातील अनेक पर्यावरणतज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. अवकाळी, गारपीट, पूर, वादळामुळे होणारी पिकांची, भाजीपाल्याची व फळबागांची हानी कशी रोखता येईल, किमान कमी कशी करता येईल, हे पाहायला हवे.

गेल्या काही वर्षांपासून देशाबरोबरच महाराष्ट्रात अवकाळी पावसाने धुडगूस घातला आहे. दिवाळीनंतर साधारण सहा-सात महिने पावसाच्या आरोग्यमय विश्रांतीचा काळ आता भूतकाळात जमा झाला आहे. मान्सून मागे फिरल्यानंतर येणारा सुखद व पोषक हिवाळा ही आता कविकल्पना होत चालली आहे. याचे कारण गेल्या काही वर्षांपासून नियमितपणे येणारा अवकाळी पाऊस होय. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, कोकण भागातील व आसपासच्या अनेक भागात भाताची लागवड मोठ्या प्रमाणात होते व नेमकी भातकाढणीची वेळ होताच वरुणराजाचे आगमन ही नित्याचीच बाब झाली आहे. यामुळे शेतीचे व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यानंतरही गहू, ज्वारी, मक्यासारखी रब्बी पिके देखील धोक्यात येत आहेत. हीच गोष्ट भाजीपाला व फळबागांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रभर होत आहे. वाढते औद्योगिकीकरण, गाड्यांची वाढती संख्या, वाढते तापमान, ढासळते पर्यावरण इत्यादी कानावर आदळणारी कारणे सर्वांना पाठ झाली आहेत. तापमानवाढीमुळे कोरड्या दुष्काळाची तीव्रताही दिवसेंदिवस वाढत आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) नुकतेच मराठवाडा व विदभार्ला या वर्षीच्या उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटांचा सामना करावा लागेल, तसेच पुणे शहर व जिल्ह्यात किमान व कमाल तापमानात लक्षणीय वाढ होईल असा अंदाज वर्तवला आहे. तर मार्चअखेरीस महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाडा व विदर्भातील काही जिल्ह्यांत अवकाळी पावसाची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी, कमी व्याजदरात कर्जपुरवठा यासारख्या अनेक मार्गांनी आपल्या परीने तोडगा काढण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. तथापि, प्रश्न हा आहे की, विद्यमान समस्येवर ठोस उपाय काय? अवकाळी, गारपीट, पूर, वादळामुळे होणारी पिकांची, भाजीपाल्याची व फळबागांची हानी कशी रोखता येईल? किमान कमी कशी करता येईल? भारतीय उपखंडात मान्सून दाखल होण्याच्या वेळापत्रकात कोणते बदल झाले आहेत, देशातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये मान्सूनचे होणारे आगमन किती पुढे जात आहे, पर्जन्यमानाचे प्रमाण किती राहात आहे, अल्पवृष्टी व अतिवृष्टी कोणत्या प्रदेशांमध्ये किती प्रमाणात होत आहे आणि याचा महाराष्ट्रासह इतर राज्यांमधील पिकांवर कोणता परिणाम होत आहे, याचा सखोल शास्त्रीय अभ्यास होणे गरजेचे आहे. मान्सून परतल्यानंतर हिवाळा व ग्रीष्म ऋतूमध्ये येणाऱ्या अवकाळी पावसाचे प्रमाण देखील दिवसेंदिवस वाढत आहे. अवकाळी पाऊस येण्याचा नेमका कालावधी, त्याचे प्रमाण, कोणत्या प्रदेशात त्याचे किती प्रमाण आहे याचादेखील अभ्यास कृषितज्ज्ञांनी करणे आवश्यक आहे. अवकाळी पावसामुळेपिकाचे, शेतीचे अतोनात नुकसान होत आहे आणि याचा परिणाम कृषी अर्थव्यवस्थेवर होत आहे. अवकाळीशिवाय कोरड्या दुष्काळाचे दुहेरी संकट शेतीवर घोंघावत आहे. अतितापमानामुळे नदीनाले, जलाशय, तलाव, विहिरी आटून कोरड्या पडत आहेत. एकीकडे हातातोंडाशी आलेली पिके अवकाळीमुळे हातातून जात आहेत, तर दुसरीकडे पाणी नसल्यामुळे शेतातील उभी पिके वाळून जात आहेत. एकूण काय, आपला बळीराजा दुहेरी संकटाने घेरला जात आहे. यावर उपाययोजना म्हणून अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्रात राज्य सरकार 'महात्मा फुले कर्जमुक्ती योजना' राबवत आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयापर्यंतचे कर्ज माफ करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांसाठी ही दिलासादायक बाब असून त्यांचे संकट कमी करण्यासाठी सहाय्यक आहे. तथापि, अवकाळी, पूर व कोरड्या दुष्काळामुळे होर्णाया पीकहानीचा मूळ प्रश्न जागेवरच उभा आहे. पिके वाहून गेल्यावर, सुकून गेल्यावर मिळणारी मदत जर अगोदरच शेतकऱ्यांना मिळाली तर होणारी संभाव्य पीकहानी, कृषी उत्पादनातील लक्षणीय घट रोखली जाऊ शकेल. पीकहानी रोखण्यासाठी अवकाळी, अतिवृष्टी, अल्पवृष्टी याचा ऋतुनिहाय, कालनिहाय, प्रदेशनिहाय, पीकनिहाय अभ्यास करून आगाऊ तयारी केल्यास नुकसानीचे प्रमाण कमीतकमी करण्यात यश मिळू शकेल. यामध्ये परंपरागत वापरल्या जाणाऱ्या उपायांशिवाय काही उपयुक्त उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत.

१.कर्जमाफी, कर्जपुरवठा तसेच 'प्रधानमंत्री फसल विमा योजना' अशा साहाय्यकारी योजनांबरोबरच विविध पिके, फळे, भाजीपाला इत्यादीचे अतिवृष्टी, अवकाळी पावसापासून संरक्षण करण्यासाठी स्वस्त दरात प्लास्टिक किंवा तत्सम आच्छादने (कॉप कव्हर), ग्रीन हाऊस इ. व्यापक प्रमाणात उपलब्ध करून द्यावेत. कोणत्या पिकासाठी (गहू, ज्वारी, भात यांसारखी पिके, फळबागा, भाजीपाला इत्यादी) कोणत्या प्रकारचे आच्छादन वापरायचे, कसे वापरायचे याचे आवश्यक प्रशिक्षण व आर्थिक मदत शेतकऱ्यांना दिल्यास पीकहानीचे प्रमाण कमीत कमी करण्यात निश्चित यश मिळेल. याचा योग्य वापर केल्यास शेतातील उभी पिके, फळे, भाजीपाला संरक्षित होतील;तसेच त्यांचे संभाव्य कीड, पीकांवरील रोगांपासूनदेखील संरक्षण होईल.

२.एकाच गावातील शेतकऱ्यांच्या शेतातून पूर, अतिवृष्टी किंवा अवकाळीमुळे जमा होणारे अधिकचे पाणी वाहून जाण्यासाठी सामूहिक शेती किंवा गट शेतीद्वारे सर्वसंमतीने योग्य मार्ग आखल्यास सर्व शेतातील तुंबलेले पाणी वाहून जाऊन पिकांची मुळे, देठ कमजोर होणार नाहीत व पीकहानी रोखता येईल.

३.शेत नांगरण्यासाठी आता बैलांचा वापर कमी होऊन त्याजागी ट्रॅक्टर व इतर कृषीयंत्रे मोठ्या प्रमाणात वापरली जातात. यामुळे शेतजमिनीवरील मातीचा वरचा थर अतिशय कडक होतो, ज्यामुळे पावसाचे पाणी शेतात अधिक प्रमाणात तुंबून (थरींशी श्रेससळपस) राहते, जमिनीत पुरेसे मुरत नाही. मातीचा हा कडक थर मोडण्याला 'सबसॉइलिंग' म्हणतात. मातीचा हा थर मऊ केल्यास पाणी तुंबून न राहता जमिनीत मुरते व यामुळे जमिनीची आर्द्रता धारणक्षमता वाढून एकूण कृषीउत्पादनक्षमता लक्षणीय वाढते. दर तीन वर्षांनी हे केल्यास मातीचा कस वाढून उत्पादनक्षमता वाढते. यासाठी सरकार पातळीवर शेतकऱ्यांना आर्थिक मदत व योग्य प्रशिक्षण दिल्यास अतिपर्जन्यामुळेहोणारे नुकसान टाळता येईल.

४.केळी, द्राक्षे, पपई, पेरू, सीताफळे इत्यादी विविध फळांचे संरक्षण अतिवृष्टी व अवकाळीपासून करण्यासाठी फळांची रोपे, झाडे स्वतंत्रपणे आच्छादित करण्यासाठी विशिष्ट प्रकारची टिकाऊ आच्छादने स्वस्त दरात उपलब्ध करून दिल्यास यांच्या योग्य उपयोगाद्वारे फळबागा उद्धवस्त होणार नाहीत; तसेच प्रतिकूल हवामानापासून फळबागांचे संरक्षण होईल.

५.अतिवृष्टी व पुरामुळे वाहून जाणारे लाखो क्युबिक मीटर पाणी 'नदीजोड'द्वारे वळवून दुष्काळगस्त भागाकडे वळवल्यास अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे तसेच अल्पवृष्टीमुळे होणारे राज्यातील शेतीचे नुकसान कित्येक पटींनी कमी करता येईल. यासाठी सरकारी पातळीवर सातत्यपूर्ण व नियोजनबद्ध प्रयत्न व्हायला हवेत.

# चिनी खोडसाळपणा

भारताच्या विरोधात वेगवेगळ्या प्रकारे कुरापती करीत दोन्ही देशांमधील सीमाप्रश्न धगधगीत ठेवण्याचा चीनचा खटाटोप कायम आहे. ईशान्येकडील अरुणाचल प्रदेशावर चीनचा दावा असून, तो या प्रदेशाला तिबेटचा दक्षिण भाग मानतो. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य घटक असून, चीनने त्यावर कितीही दावा केला किंवा त्यासाठी तेथील नागरिकांना स्टेपल व्हिसा देण्यापासून विविध ठिकाणांना नावे देण्यापर्यंतचा खोडसाळपणा केला, तरी भौगोलिक वस्तुस्थितीत कोणताही बदल होणार नाही. हीच बाब परराष्ट्र खात्याने पुन्हा एकदा अधोरेखित केली. अरुणाचल प्रदेशच्या चिनी नामकरणानंतर २०१७पासून बीजिंग या प्रदेशातील अनेक जागांना चिनी नावे देत आहे. चीनने आतापर्यंत तेथील ३२ ठिकाणांचे नामकरण केले असून, आणखी तीस नव्या नावांची यादी नुकतीच जारी केली. आपल्या भूमीतील ठिकाणांच्या नामकरणाला भारताने रास्त आक्षेप घेतला असून, अरुणाचल हा भारताचा घटक असल्याची वस्तुस्थिती कायम राहणार असल्याचे म्हटले आहे. चीनच्या या कृतीला परराष्ट्र खात्याने मूर्खपणाची कृती ठरविली आहे; परंतु हा मूर्खपणा चीन मुद्दाम करीत आहे. भारत-चीन सीमाप्रश्न जिवंत ठेवण्याच्या डावपेचातील ही खेळी आहे. भारतीय प्रदेशावर दावा सांगण्यापासून भारतीय हद्दीत घुसखोरीपर्यंत अनेक कारवाया चीन सतत करीत असतो. जागतिक सत्ता होण्याच्या आकांक्षेने पछाडलेला चीन आपल्या शक्तीचे प्रदर्शन करीत विस्तारवादाचे धोरणही अवलंबत आहे. म्हणूनच तो कधी डोकलाममध्ये आव्हान निर्माण करतो, तर कधी गलवान खोऱ्यात. प्रत्येक चिनी आक्रमणाला भारताने चोख प्रत्युत्तर दिले असले, तरी चीन घुसखोरी करण्याचे थांबविणार नाही, हे या सर्व घटनांतून स्पष्ट होते. उभय देशांमध्ये तीन हजार किलोमीटर लांबीची सीमारेषा असून, त्यापैकी बहुतेक भाग हिमालयीन पर्वतरांगांतून जातो; शिवाय अनेक ठिकाणी सीमेबाबत स्पष्टताही नाही. त्याचाच फायदा घेऊन चिनी सैन्य भारतीय हद्दीत घुसत असतात. विस्तारवादाची चिनी महत्त्वाकांक्षा कधीही लपून राहिलेली नाही.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचे निकृष्ट काम?

## संरक्षण भिंतीच्या काँक्रिटीकरण कामात दगडी बांध, कारवाईची मागणी



"जव्हार तालुक्यातील कापरीचापाडा ते आपटाळे रस्त्यावर सुरु असलेल्या निकृष्ट दर्ज्याच्या संरक्षण भिंतीच्या काँक्रिटीकरण कामाची चौकशी करून कारवाई करावी, कारवाई न झाल्यास काँग्रेसचे कार्यकर्ते भाग पाडतील.
**संपत पवार, काँग्रेस जव्हार तालुका अध्यक्ष**

■ **जव्हार** : जव्हार सार्वजानिक बांधकाम विभागाच्या भ्रष्टाचाराची नेहमीचा चर्चा होत असताना पुन्हा एकदा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाचा प्रताप समोर आला असून, जव्हार तालुक्यातील कापरीचापाडा ते आपटाळे रोडवरील संरक्षण भिंतीच्या काँक्रिटीकरण कामात चक्क दगडी बांध भरून भिंतीचे काम सुरू असल्याचे ग्रामस्थांनी लक्षात आणून दिले. त्यानंतर बांधकाम विभागाने काम सुरू असलेली निकृष्ट दर्ज्याची भिंत पाडून नवीन संरक्षण भिंत बांधून दिल्याचे बांधकाम विभागाने सांगितले.

ग्रामीण भाग, डोंगर दऱ्यातील रस्ते टिकावे, पावसाळ्यात आदिवासी कुटुंबांची हेळसांड थांबावी याकरता जव्हार सां. बा. विभागामार्फत पक्के आरसीसी काँक्रिटीकरण करण्याकरता लाखो रुपयांची मजुरी घेवून कापरीचापाडा ते आपटाळे रस्त्यांवरील संरक्षण भिंतीच्या काँक्रिटीकरण रस्त्याच्या कामाला सुरवात केली. मात्र त्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठेकेदाराने अधिक नफा, फायदा घेण्याकरता आणि कामे आटोपण्यारता संरक्षण भिंतीच्या काँ क्रिटीकरण कामात दगडी बांध घालून काम सुरू केले. त्यानंतर निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर तेथील ग्रामस्थांनी काम बंद पाडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना कळविले. निकृष्ट दर्जाचे सुरू असलेले काम पुन्हा उचकटून पुन्हा ईस्टीमेंटनुसार काम केले जाईल असा सूचना बांधकाम विभागाने सबंधित ठेकेदाराला सूचना केल्याचे सांगितले.

■ या कामांत अधिक दगड, गोठे, टाकून कामे करतात यामुळे जव्हार सां. बा. विभागातील ठेकेदार धनदांडगे झाल्याचे समोर आहे. जव्हार तालुक्यातील कापरीचापाडा ते आपटाळे रोडवरील संरक्षण भिंतीच्या काँक्रिटीकरण कामात चक्क दगडी बांध बांधून काँक्रिटीकरण भिंतीचे काम सुरू आहे. हे निकृष्ट दर्जाचे कामाचा नमुना पुढे आला आहे. त्या सुरू असलेल्या निकृष्ट कामाची चौकशी करून कारवाईची मागणी होत आहे.

# मालमत्ता कर वसुलीसाठी पालिकेची सूट

■ **ठाणे**: ठाणे महापालिकेच्या माध्यमातून नव्या आर्थिक वर्षात मालमत्ता कर वसुलीची मोहीम १ एप्रिल पासूनच सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार करदात्यांच्या मोबाइलवर एसएमएसच्या माध्यमातून महापालिकेने बिल पाठवण्यास सुरवात केली आहे. याशिवाय १५ जून पर्यंत संपूर्ण कराची रक्कम एकत्रित भरतील अशा करदात्यांना मालमत्ताकराच्या सामान्यकरात १० टक्के सुट देण्यात येणार आहे.

ठाणे महापालिकेच्या करदात्यांना पहिल्या टप्प्यातच मालमत्ता कर भरावा यासाठी सवलत योजना देखील जाहीर केली आहे. त्यानुसार जे करदाते २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराच्या देयकातील पहिल्या सहामाहीच्या मालमत्ता करासोबत दुसऱ्या सहामाहीचा मालमत्ता कर, अशी संपूर्ण कराची रक्कम एकरकमी १५ जून, २०२४ पर्यंत महापालिकेकडे जमा करतील, अशा करदात्यांना त्यांच्या दुसऱ्या सहामाहीच्या देयकातील सामान्य करामध्ये १० टक्के सवलत देण्यात येणार आहे. यानुसार १५ जून पर्यंत रक्कम भरल्यास १० टक्के सुट दिली जाणार आहे. तर १६ जून ते ३० जून या कालावधीत या रकमेचा भरणा केल्यास ४ टक्के, १ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत भरल्यास ३ टक्के आणि १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालावधीत भरल्यास २ टक्के सवलत दिली जाणार असल्याची माहिती महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने दिली आहे.

■ मात्र आर्थिक वर्ष संपत आले तेव्हा मालमत्ता कर विभागाने ७०३कोटी ९३ लाखाची वसुली केली आहे. तर यंदा देखील मालमत्ता कर विभागाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार यंदा या विभागाला ८१९कोटी ७१ लाखाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

■ आता ते पूर्ण करण्यासाठी महापालिकेने १ एप्रिल पासूनच सुरवात केली आहे. पहिल्याच दिवशी महापालिकेच्या या विभागामार्फत करदात्यांना देयके व कर भरण्याच्या लिंकसह एसएमएसद्वारे पाठविण्यात आली.




# 18 days after 2 boys die in its tank, BMC razes down family hut

■ **Mumbai**

More than two weeks after two brothers, aged four and five, died after falling into a water tank at Maharshi Karve Garden in Wadala, the Brihanmumbai Municipal Corporation (BMC) demolished their hut along with most shanties on Road No. 16, Subhash Nagar, terming them illegal encroachments. The father of the deceased, Manoj Vangri, alleges that the civic body took revenge on them as the Bombay High Court had come down heavily on it for not covering the water tank properly.

Manoj, the father of the boys, Ankush and Arjun Vangri, is in Bharuch, Gujarat, with his wife. He told mid-day over the phone, "They had never tried to demolish these huts before my sons died. We have been staying here for two decades. We don't know why they have razed them all of a sudden."





The scene of the tragedy at Maharshi Karve Garden, Wadala, on Friday. Pic/Sayyed Sameer AbediThe scene of the tragedy at Maharshi Karve Garden, Wadala, on Friday. Pic/Sayyed Sameer Abedi

After the children's bodies were found on March 18, the Bombay High Court took suo motu cognisance of the matter and slammed the BMC for failing to cover the water tank. While the matter is in the High Court, the BMC began demolishing the hutments at Subhash Nagar on April 3.

"Even after 20 days, I am clueless about the case's status. Now the BMC has demolished the place in which I resided. Nothing is left; only my children's photos are left behind as a reminder of their tragic end. The BMC has offered no compensation to us and we are homeless and helpless," said Manoj.

According to locals, there were about 50 huts at Subhash Nagar and people had been residing in them for over two decades. They claimed the BMC had seized their belongings and had not provided alternative accommodation.

"This road has been our home for about 20 years, but our houses were demolished in the blink of an eye. We are clueless about whether our belongings have been seized by the BMC or are scattered. We don't know where to take shelter from the scorching sun," said a resident.

'We are suffering'

Kanji Kavithya, the paternal uncle of Ankush and Arjun, said, "They had waited for someone to die to cover the tank. And now they have demolished the place where the victims resided. The BMC is just finding new ways to torture us. They seized our belongings and the police would beat us if we tried to stop this. They should have allocated us a place to stay before demolishing our huts. We are now on the streets. We are utterly helpless. I demand justice for both the boys. This happened because of the negligence of the BMC. We are all suffering because of this."

OfficialSpeak : Deepak Chavan, senior police inspector, Matunga police station, said, "We have registered an FIR in this matter and are investigating the case. Illegal huts have been demolished by the BMC and no one was beaten during the process." Assistant Municipal Commissioner Chakrapani Alle told mid-day, "We had received complaints from the police and Dosti Empire that people were staying on footpaths. The illegal huts have been demolished and the height of the garden wall increased as encroachers had broken the wall."

April 3 : Day BMC started razing huts

March 18 : Day boys' bodies were found

# Surya: A ray of hope for Mumbai Indians?



■ **Mumbai**

After months of recovering from his sports hernia surgery, finally, the world's number one T20I batsman Suryakumar Yadav has returned to competitive cricket. Suryakumar is expected to feature in the Mumbai Indians' upcoming IPL 2024 encounter against Delhi Capitals at the Wankhede on Sunday.

So far, Hardik Pandya-led Mumbai Indians have faced three consecutive defeats in the IPL 2024. The side has collectively failed to make an impact in all departments of the game. The inclusion of Suryakumar will provide stability to MI's middle-order batting lineup.

Openers Rohit Sharma and Ishan Kishan looked quite confident with the willow but are yet to convert their starts into big scores. On the other hand, Tilak Varma and Naman Dhir in the middle-order try to stabilize the batting. Hardik Pandya coming down the order has not yet yielded scores up to the mark. On Sunday, if the skipper manages to put on some impressive show with the bat or bowl, there are chances of the home crowd turning their boos into cheers for Pandya. If MI plays Suryakumar against Delhi Capitals, the hosts will get a deep dig in their batting.

But, DC too coming with the same background, having lost three games out of four will also look to bounce back strongly against MI. Opening batsman Prithvi Shaw being a Mumbai lad will eye some impressive strokes in his home ground.


Yadav representing Mumbai in domestic cricket will be well aware of the Wankhede track. This will be an additional benefit for the veteran's return. The interesting thing to watch out for in MI's Sunday IPL 2024 fixture will be the batting position of Surya. With Naman consistently scoring runs at number three, will he be pushed down the order due to the key batsman's return?

The fitness and form of Suryakumar will also be in the sight of the national selectors ahead of the upcoming T20 World Cup 2024. The global showpiece is set to begin from the month of June which will be hosted by the West Indies and the USA.

So far, featuring in 139 matches in the Indian Premier League, the right-hander has accumulated 3,249 runs with a highest score of unbeaten 103 runs.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेरूळ पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन

## गांजा बाळगणाऱ्यासह तडिपार व्यक्ती व बांगलादेशी नागरिकांची धरपकड



**नवी मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेरुळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुरुवारी रात्री कोम्बिंग ऑपरेशन राबवून गांजा बाळगणाऱ्यासह तीन बांगलादेशी नागरिक तसेच हद्दपार केलेल्या गुन्हेगार अशा एकूण ५ जणांची धरपकड पोलिसांनी केली. त्याशिवाय पोलिसांनी रेकॉर्डवरील आरोपी, पाहिजे आरोपी, गुंड, हिस्ट्रीशिटर, संशयित व्यक्तींची तपासणी करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली. या कारवाईमुळे नेरुळ परिसरात वावरणाऱ्या गुन्हेगारांचे तसेच अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

लोकसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने नवी मुंबई पोलिसांनी रेकॉर्डवरील आरोपी, पाहिजे आरोपी, गुंड, हिस्ट्रीशिटर तसेच अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांची झाडाझडती सुरू केली आहे. त्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी वेगवेगळ्या भागांमध्ये कोम्बिंग ऑपरेशन राबवून गुन्हेगार व बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांची धरपकड सुरू केली आहे. गुरुवारी रात्री नेरुळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन राबवण्यात आले. यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील इतर पोलीस ठाण्यांतील अतिरिक्त मनुष्यबळ तसेच राईट कंट्रोल पोलीस पथक मागून २१ अधिकारी व ९६ अंमलदारांच्या १४ तुकड्यांमध्ये विभागणी करण्यात आली.

त्यानंतर पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन राबवून बालाजी टेकडी परिसरातील झोपडपट्टीमधून मंगेश प्रकाश बोटले (३२) याला ९ हजार किमतीच्या ८७४ ग्रॅम वजनाच्या गांजासह पकडले. त्याचप्रमाणे दारावे गाव सेक्टर-२६ मधील समर्थ कृपा बिल्डिंगमध्ये बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या जाफर सलाम काझी (३५), हवा बेगम जाफर काझी (३०), नाजमुल सलाम काझी (२५) या तीन बांगलादेश नागरिकांची देखील धरपकड केली. या कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान नेरुळच्या एलपी ब्रिजखाली दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आलेला अभिलेखावरील बोनी शंकर सांळुखे (२५) हा तडिपार व्यक्ती पोलिसांच्या हाती लागला.

या कारवाईदरम्यान दारू बाळगणाऱ्या ३ तसेच दारुचे सेवन करणारे १४ अशी एकूण १७ व्यक्तींविरोधात पोलिसांनी कारवाई केली. त्याचप्रमाणे अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ११ व्यक्तींविरोधातदेखील कारवाई करण्यात आली. नेरुळ पोलीस ठाणे हद्दीत ४ ठिकाणी लावण्यात आलेल्या नाकांबदीदरम्यान, पोलिसांनी मोटार वाहन कायद्याचे उल्लघंन करणाऱ्या ८० व्यक्तींविरोधात कारवाई करून त्यांच्याकडून दंड वसूल केला आहे. सदर कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान दोन पाहिजे असलेले आरोपी पोलिसांच्या हाती लागले आहेत. तसेच बेलेबल वॉरंट व नॉन बेलेबल वॉरंट असलेले ३ आरोपीदेखील मिळून आले. त्याचप्रमाणे १० संबंधितांना समन्सची बजावणी करण्यात आली. त्याशिवाय सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणाऱ्या ७० व्यक्तींविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच अभिलेखावरील पाहिजे, फरारी व हिस्ट्रीशिटर, गुंड यांची तपासणी करण्यात आली. सदरची कारवाई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या निर्देशानुसार परिमंडळ-१ चे पोलीस उपआयुक्त पंकज डहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

### लाखोंचा खर्च करूनही विहिरी पडल्या कोरड्याठाक

# कोल्हेधव ग्रामस्थांचा जीव 'कासावीस'





**मोखाडाः** तालुक्यातील गाव पाड्यांची पाणीटंचाई दूर करण्यासाठी ग्रामपंचायतस्तरावर लाखो रुपयांच्या निधीची उधळपट्टी केली जाते .काही वेळा पाणी पुरवठ्याची योजना सफल होते. तर काही वेळा ठेकेदारांच्या आडमुठे धोरणामुळे वर्षभरातच बंद पडते.असाच काहीसा प्रकार आसे ग्रामपंचायत मधील कोल्हेधव या सहा घरांची वस्ती असलेल्या गावात झाला असून गेल्या पाच वर्षांत लाखो रुपयांचा निधी पाणी टंचाई निर्मूलनासाठी खर्च केलेला असताना ही कोल्हेधव ग्रामस्थांची पाणी टंचाईची समस्या संपुष्टात आलेली नाही. उलट यावेळी तर त्यांनी आपल्याला टँकरचे पाणी मिळवण्यासाठी पाणी पुरवठा विभागाकडे मागणी केली आहे.

गाव पाड्यातील नागरिकांना मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी शासनाकडून ग्रामपंचायतींना वर्षाकाठी लाखो रुपयांचा निधी मंजूर केला जातो.तरीदेखील गाव पाड्यातील पाणी टंचाईची समस्या कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे.त्यामुळे अशा मानवनिर्मित पाणी टंचाईचे चटके गेल्या काही वर्षांपासून कोल्हेधव गावातील नागरिकांना सुध्दा सहन करावे लागत आहेत.सहा घरांची वस्ती असलेल्या कोल्हेधव गावात जेमतेम तीस ते चाळीस माणसे राहतात. येथील नागरिकांना इतर मुलभूत सुविधांची तर वानवा आहेच.परंतु त्याही पेक्षा पिण्यासाठी चांगले पाणी मिळावे यासाठी गेल्या पाच वर्षांत पंधरा ते वीस लाख रुपयांचा निधी हा केवळ पाणी टंचाई दुर करण्यासाठी खर्च केलेला असतानाही येथील नागरिकांना महिन्याभरापासून पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे.महत्वाचे म्हणजे कोल्हेधव गाव मोखाडा तालुक्यात येत असून पाणी पुरवठा करण्यासाठी तालुक्यातील बलद्याचापाडा मार्गाने नाशिक जिल्ह्यातील आडगाव, काकडवळण या मार्गाने जवळपास चाळीस ते पन्नास किलोमीटरचे अंतर पार करून कोल्हेधव गावाला पाणी पुरवण्याची नामुष्की प्रशासनावर ओढावली आहे.मुळात कोल्हेधव गावात ये जा करायला पूल बांधला असता तर शासनाचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचला असता हे नक्की.

तर ग्रामपंचायतीकडून विहिर बांधणे, जुन्या विहिरीची दुरुस्ती करणे यासह सौरऊर्जेवर चालणारी नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणे अशा पाणी पुरवठयाच्या योजनांवर लाखो रुपयांचा निधी खर्च झालेला असताना ही पाणी टंचाई संपायला तयार नाही. त्यामुळे खर्च केलेला निधी नेमका जातो कुठे ? याचा प्रशासनाने शोध घेतला पाहिजे.

# नोकरीचे आमिष दाखवून लाखोंचा गंडा



**मुंबई :** मालाडमध्ये प्लेसमेंट ऑफिस थाटून ठगांनी बेरोजगारांना विदेशात नोकरीचे आमिष दाखवून १७.७५ लाखांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून मालाड पोलीस अधिक तपास करत आहेत.

मूळचे उत्तर प्रदेशमधील रहिवासी असलेल्या वीरेंद्र सिंह (५१) यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांनी यापूर्वी उमान, सौदी अरेबिया, अबुधाबी, कुवैत, दोहा (कतार) या देशांत वेगवेगळ्या रिफायनरी प्लँटमध्ये क्रेन ऑपरेटर म्हणून नोकरी केलेली आहे. कोरोना काळात ते मायदेशी परतले आणि गावी शेती करू लागले. जानेवारी महिन्यात त्यांना एका अनोळखी नंबरवरून कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने त्यांना तो मुंबईतील मालाडमध्ये कार्यालय असलेल्या आयेशा प्लेसमेंट कंपनीतून अभिमन्यू सिंह बोलत असल्याचे सांगत तुम्हाला विदेशात नोकरी हवी का? अशी विचारणा केली. यापूर्वी विदेशात नोकरीचा अनुभव असल्याने आणि नोकरीची आवश्यकता असल्याने वीरेंद्र यांनी त्याला होकार दिला. दक्षिण आफ्रिका देशामध्ये नोकरी उपलब्ध असून आवश्यक कागदपत्रांसोबत सर्व्हिस चार्ज आणि विमान तिकीट असा एकूण ७५ हजार रुपये खर्च येईल, असे सांगितले. वीरेंद्र यांनी त्याला वैद्यकीय आवश्यक कागदपत्रे पाठवली. काही दिवसांनी वीरेंद्र यांना नोकरीचे नियुक्ती पत्र आणि दक्षिण आफ्रिका देशात नोकरीसाठीचा उल्लेख असलेला व्हिसा यांचे फोटो पाठवून २० हजार रुपये घेण्यात आले.

वीरेंद्र यांना दक्षिण आफ्रिकेला जाण्याचे विमानाचे तिकीट बुक केल्याचे सांगत २४ मार्चला मुंबईत येण्यास सांगितले गेले. वीरेंद्र यांनी मुंबईत येत आयेशा प्लेसमेंट कंपनीच्या कार्यालयात जात अभिमन्यू सिंह याची भेट घेतली. या वेळी सतीश पान्डेय, अनम अन्सारी आणि एक तरुणी तेथे होती. तसेच विदेशात नोकरीला जाण्यासाठी २० ते २५ जण कार्यालयाबाहेर उभे होते. विमानाचे तिकीट रद्द झाल्याचे सांगून वीरेंद्र यांना थांबण्यास सांगण्यात आले. तोपर्यंत त्यांच्याकडून आणखी ४५ हजार रुपये उकळण्यात आले. वीरेंद्र यांना ३ एप्रिलला बोलावण्यात आले होते. ते आदल्या दिवशी कार्यालयात पोहोचले असता, कार्यालय आणि मोबाईल बंद करून सर्वजण पसार झाल्याची धक्कादायक माहिती त्यांना समजली. येथे १०० हून अधिक लोक जमा झाले होते. विदेशात नोकरीला जाण्यासाठी प्रत्येकाने आयेशा प्लेसमेंट कंपनीला ५० हजार ते एक लाख रुपये भरले होते. यातील एक जण त्याला देण्यात आलेला रशियन व्हिसा तपासणी करण्यासाठी रशियन दुतावासामध्ये गेला असता, तेथील कर्मचाऱ्यांनी व्हिसा बनावट असल्याचे सांगितले. त्यानंतर मात्र आपली फसवणूक झाल्याची या सर्वांची खात्री पटली. अखेर, वीरेंद्र आणि २२ जणांनी मालाड पोलीस ठाणे गाठून एकूण १७ लाख ७५ हजारांच्या फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये दिडशे भंगार गोडाऊन जळून खाक

## १८ तासानंतरही धुमसतेय आग



**पिंपरी- चिंचवड :** पिंपरी-चिंचवडमध्ये चिखली परिसरात भंगार गोडाऊनला भीषण आग लागल्याने दीडशे गोडाऊन जळून खाक झाले आहेत. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याचा अंदाज अग्निशमन विभागाने वर्तवला आहे. चिखली परिसरात हजारो भंगार गोडाऊन आहेत. तिथे दरवर्षी आगीच्या घटना घडतात. आश्चर्यकारक बाबा म्हणजे आगीमध्ये जळून खाक झालेली दीडशे गोडाऊन हे अनधिकृत आहेत. अशी कबुली स्वतः महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. महानगरपालिकेचे अधिकारी मनोज लोणकर यांनी याबाबत माहिती दिली आहे. अठरा तास उलटून ही आग धुमसत असून कुलिंग चे काम सुरू आहे.

शनिवारी मध्यरात्री एकच्या सुमारास चिखलीतील गोडाऊनला भीषण आग लागली. आगीने रौद्ररूप धारण करत शेजारीच असलेल्या इतर गोडाऊनला देखील आग लागल्याने तब्बल दीडशेपेक्षा अधिक गोडाऊनला आग लागल्याची घटना घडली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, पीएमआरडीए त्याचबरोबर खासगी कंपन्यांकडून आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी १८ तासांच्या अथक प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आणली आहे. सध्या त्या ठिकाणी कुलिंगचं काम सुरू असून आग धुमसत असल्याने आणखी काही तास लागल्याची शक्यता आहे. चिखलीत अगदी छोट्या गल्ल्यांमधून या दुकानांकडे जावं लागतं. त्यामुळे अग्निशमन वाहनांना त्या ठिकाणी जाण्यासाठी कसरत करावी लागली.

# सशस्त्र हल्ला करणाऱ्याला बेड्या



**मुंबईः** पूर्वीच्या वादातून एका कुटुंबातील ५ जणांवर प्राणघातक हल्ला करून हैदराबादला पसार झालेल्या आरोपीला रफी अहमद किडवाई मार्ग पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. रियाज कुरेशी असे अटक आरोपीचे नाव असून, या गुन्ह्यात अटक आरोपींची संख्या ८ झाली आहे.

वडाळा मच्छी मार्केट परिसरात कुटुंबासोबत राहत असलेल्या नझीबउल्ला गणी (५५) यांचा कोळशाचा व्यवसाय आहे. गणी यांच्या तीन मुलांचा याच परिसरात राहणाऱ्या जहीर शेख ऊर्फ चाटी, सोहेल कुरेशी ऊर्फ बब्बू, रियाज कुरेशी, अल्ताफ कुरेशी, अरिफ कुरेशी आणि जिशान कुरेशी यांच्याशी वाद झाला होता. १९ मार्चच्या रात्री गणी यांचा मुलगा रिझवान हा त्याचा मित्र सिराज याच्यासोबत घरासमोरील रस्त्यावर गप्पा मारत असताना सोहेल कुरेशी ऊर्फ बब्बू आणि रियाज कुरेशी हे त्यांच्याकडे बघून थुंकले आणि शिवीगाळ केली. गणी यांच्या मुलाने त्यांना शिवीगाळ का केली याचा जाब विचारला असता सोहेल कुरेशी याने त्यांना ठार मारण्याची धमकी दिली. दुसऱ्या दिवशी रात्री जहीर शेख ऊर्फ चाटी, सोहेल कुरेशी ऊर्फ बब्बू, शोएब कुरेशी, रियाज कुरेशी, अल्ताफ शेख, आरिफ शेख, जिशान कुरेशी, आमीर कुरेशी आणि जुनेद शेख यांनी गणी आणि त्यांच्या चार मुलांवर सशस्त्र हल्ला चढवला. यात गणी आणि त्यांची चार मुले गंभीर जखमी झाली. हल्ल्याची माहिती मिळताच रफी अहमद किडवाईमार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तत्काळ उपचारासाठी केईएम रुग्णालयात दाखल केले. घटनेची नोंद करून तपास करत असलेल्या रफी अहमद किडवाई मार्ग पोलिसांनी गणी यांची फिर्याद नोंदवून घेत हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला. याच दरम्यान गणी यांचा मुलगा जावेद याचा उपचारादरम्यान २४ मार्चला मृत्यू झाला.पोलिसांनी गुन्ह्यात हत्येच्या कलमाची वाढ करत एकूण ७ आरोपींच्या मुसक्या आवळल्या. अटक आरोपींकडील चौकशी आणि गुन्ह्याच्या तपासात आरोपी रियाज कुरेशी हा सेनेचा माजी पदाधिकारी नाययण ढोगी याच्या एका नातेवाईकाच्या हैदराबादमधील घरी लपून बसला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी ढोगी याच्या मदतीने हैदराबाद येथे जात रियाज कुरेशी याला बेड्या ठोकल्या आहेत.

# मुलुंड, भांडुपमधून दुचाकी चोरणारे दोन अल्पवयीन गजाआड

**मुंबई :** मुंबईच्या पूर्व उपनगरातील मुलुंड आणि भांडुप परिसरात रस्त्याच्या कडेला पार्क केलेल्या दुचाकी चोरणाऱ्या १६ आणि १३ वर्षांच्या दोन अल्पवयीन मुलांना मुलुंड पोलिसांनी ताब्यात घेत त्यांची रवानगी बालसुधारगृहात केली आहे. या दोघांनी केलेल्या ६ गुन्ह्यांची उकल करत पोलिसांनी त्यांच्या जवळून चोरीच्या आठ दुचाकी हस्तगत केल्या आहेत. मुलुंड पश्चिमेकडील स्वप्ननगरी परिसरात एका इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ पार्क केलेली दुचाकी २१ मार्चच्या रात्री चोरी करण्यात आली. दुचाकी मालकाने दिलेल्या तक्रारीवरून, या प्रकरणी गुन्हा दाखल करून मुलुंड पोलीस ठाण्याचे वपोनि. अजय जोशी आणि पोनि. (गुन्हे) आदिनाथ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि. गणेश मोहिते यांच्या पथकाने तपास सुरू केला. मुलुंड आणि भांडुप परिसरात रस्त्याच्या कडेला पार्क केलेल्या दुचाकी दोन अल्पवयीन मुले चोरी करत असल्याची माहिती मोहिते यांच्या पथकाला मिळाली. त्यानुसार, पोलीस पथकाने सापळा रचून या दोन्ही अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. पोलिसांनी या मुलांकडून चोरीच्या ४ लाख १५ हजार रुपये किमतीच्या ८ दुचाकी जप्त केल्या. यातून दुचाकी चोरीच्या ६ गुन्ह्यांची उकल झाली असून, दोन दुचाकींबाबत पोलीस तपास करत आहेत.

# पती आणि सासूच्या छळाला कंटाळून नवविवाहितेची आत्महत्या




**मुंबईः** पती आणि सासूकडून होत असलेल्या कौटुंबिक छळाला कंटाळून १८ वर्षीय नवविवाहितेने लग्नानंतर अवघ्या दोन महिन्यांत मृत्यूला कवटाळल्याची धक्कादायक घटना दहिसरमध्ये घडली. मृत विवाहितेच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून, या प्रकरणी पतीसह सासूविरोधात गुन्हा दाखल करून दहिसर पोलीस अधिक तपास करत आहेत.

घाटकोपर पश्चिमेकडील असल्फा गाव परिसरात राहात असलेल्या मनोजकुमार रेड्डी (४६) यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची १८ वर्षीय मुलगी स्नेहा हिचा नातेवाईकाच्या ओळखीने २८ जानेवारीला कर्नाटक येथील गावी कैलाश वडारी नावाच्या तरुणासोबत विवाह झाला. विवाहावेळी पती कैलाशने तिचे नाव ज्योती ठेवले.

कैलाश हा वसई येथे एका कंपनीत ग्राफिक डिझायनर होता. त्यामुळे विवाहानंतर स्नेहा पती कैलाशसोबत दहिसर पूर्वेकडील केतकीपाडा येथे असलेल्या घरी राहायला आली. पती कैलाश आणि दोन सासवांसोबत ती राहात होती. विवाहाच्या काही दिवसांनी यातील अनंतमा नावाच्या सासूने किरकोळ कारणावरून ज्योतीला शिवीगाळ करून त्रास देण्यास सुरुवात केली. पुढे, माहेरहून सोने आणि गाडी आणण्यासाठी तिचा शारीरिक आणि मानसिक छळ सुरू झाला. याच छळाला कंटाळून ज्योतीने ४ एप्रिलला राहत्या घरी साडीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच दहिसर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत ज्योतीला उपचारांसाठी शताब्दी रुग्णालयात दाखल केले. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता. डॉक्टरांनी ज्योतीला दाखलपूर्व मृत घोषित केले. घटनेची नोंद करून तपास करत असलेल्या दहिसर पोलिसांनी ज्योतीचे वडील मनोजकुमार यांची फिर्याद नोंदवून घेत या प्रकरणी पती कैलाश आणि सासू अनंतमा यांच्या विरोधात ज्योतीचा कौटुंबिक छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

# राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षास आर्थिक भ्रष्टाचारप्रकरणी गुन्हे शाखेकडून अटक



**मीरा-रोडः** मीरा-भाईंदरचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( अजित पवार गट )चे जिल्हाध्यक्ष मोहन पाटील यांना आर्थिक गुन्हे शाखेने शुक्रवारी पहाटे अटक केली आहे. मोहन पाटील हे भाईंदर मधील नामांकित शिक्षण संस्थेचे माजी कार्याध्यक्ष होते. या संस्थेत भ्रष्टाचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात पाटील यांना अटक करण्यात आली आहे. पाटील यांना दुपारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. निवडणुकीची धामधूम सुरू असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जिल्हाध्यक्षाला अटक केल्याने शहरात चर्चेला उधाण आले आहे.

भाईंदरच्या आगरी समाजाच्या अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेच्या २०११ ते २०१९ या कालावधीत मोहन पाटील हे कार्याध्यक्षपदी होते. त्यांच्या कार्यकाळात संस्थेमध्ये कोट्यवधींचा गैरव्यवहार व आर्थिक अपहार केल्याप्रकरणी संबंधितावर गुन्हे दाखल झाले होते. अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेमध्ये खिचडी घोटाळा , डिजिटल ओळखपत्र आणि संगणक दुरुस्तीच्या नावाखाली सुमारे सहा कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. संध्या पाटील यांच्या आदर्श महिला गटाकडून परस्पर शालेय पोषण आहारचे काम काढून मोहन पाटील यांनी ते स्वतःच्या मधुमोहन महिला बचत गटाला परस्पर दिले. शासनाचा योजनेतील तांदूळ विकला. संगणक व पोषण आहार मधील घोटाळ्याची तक्रार व सतत पाठपुरावा केल्यानंतर २०१९ मध्ये नवघर पोलीस ठाण्यात तत्कालीन कार्याध्यक्ष मोहन पाटील,संस्थेचे लेखापाल प्रशांत नरेश पाटील, रिंग इंडियाचे भागीदार न्यूमान रेहमान आणि कुणाल गुडेकर, संस्थेचे वासुदेव पाटील, गुरुनाथ पाटील , दिलीप पाटील, शरद पाटील यांच्यावर गुन्हा दाखल झाला.त्यानंतर हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. यानंतर पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत १० एप्रिल २०१९ रोजी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला.या अर्जानंतर पाटील यांच्या वकिलांनी वेगवेगळी कारणे सांगून ३२ वेळा तारीख घेतली. या प्रकरणात हळूहळू ४ वर्षे ९ महिन्यांचा कालावधी लोटला.न्याय मिळण्यास विलंब होत असल्याने मोहन पाटील यांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने २५ जानेवारी २०२४ रोजी उच्च न्यायालयास एक महिन्यामध्ये सुनावणी घेऊन सदर अटकपूर्व जामीन अर्ज निकाली काढण्याचे आदेश दिले. उच्च न्यायालयाने २३ फेब्रुवारी २०२४ रोजी मोहन पाटील व प्रशांत पाटील यांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले तर अन्य आरोपीना जामिनाचा दिलासा दिला. मोहन पाटील व प्रशांत पाटील यांचे अटकपूर्व जमीन अर्ज फेटाळल्यानंतर मोहन पाटील हे फरार झाले होते.तर प्रशांत पाटील याने आर्थिक गुन्हे शाखेत शरणागती पत्करली. अखेर आर्थिक गुन्हे शाखेने मोहन पाटील यांना शुक्रवारी अटक केली आहे. ठाणे न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ५ दिवसाची म्हणजे ८ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी आंदोलनाच्या भीतीने सामूहिक रजेवर

## श्रमजीवींच्या आंदोलनामुळे काम करणे मुश्कील असल्याचा आरोप



**वाडा :** पालघर जिल्ह्यात श्रमजिवी संघटनेच्या माध्यमातून जलजीवन मिशन योजनेतंर्गत आंदोलने सुरू आहे. या आंदोलनात कर्मचाऱ्यांना घेराव घालून डांबून ठेवण्यात येत असून अपशब्द वापरण्यात येत आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मानसिक व शारीरिक स्थितीवर परिणाम होत असल्याचा आरोप करत पालघर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी गुरुवारपासून सामुहिक रजेवर गेले असल्याने पाणी पुरवठा विभागाचा कारभार ठप्प झाला आहे.

पालघर जिल्ह्यातील प्रत्येक गाव पाड्यात जलजीवन मिशन योजनेतंर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम करण्यात आले आहे. यातील बहुतांशी योजना या कालावधी पूर्ण होऊनही पूर्ण होऊ शकलेल्या नाहीत. तर अनेक योजनांची कामे निकृष्ठ दर्जाची झाली आहेत.अनेक गावात पाणी पुरवठा योजनेच्या विहिरी बांधण्यात आल्या आहेत.मात्र त्या आतापासूनच कोरड्या पडल्या आहेत.त्यामुळे जिल्ह्यात पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

> वाडा पाणी पुरवठा विभागातील शाखा अभियंते, कनिष्ठ अभियंते हे कालपासून सामुहिक रजेवर गेले आहेत. याबाबत त्यांनी कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग पालघर यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे .या रजेवरून मी संबंधितांना नोटीस बजावली असून सात दिवसांत खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत.
>
> **-बी. आर . कोळी**
> **प्रभारी गटविकास अधिकारी पंचायत समिती वाडा**

कोटयवधी रूपये खर्च करूनही नागरिकांना पाणी मिळत नसल्यानेश्रमजीवी संघटनेने जिल्ह्यातील प्रत्येक गाव पाड्यातील पाणी पुरवठा योजनांची पाहणी करून सद्यस्थिती काय आहे याची माहिती जाणून घेतली.त्यानंतर श्रमजिवी संघटनेने पालघर या जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीवर १ ते ७ एप्रिल पर्यंत हंडा कळशी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात श्रमजीवी संघटनेचे कार्यकर्ते पाणी पुरवठा योजनेचे शाखा अभियंते, कनिष्ठ अभियंते ,ठेकेदार यांच्याकडून योजनांचा तपशील म्हणजे कामाची प्रशासकीय मान्यता, अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, कार्यारंभ आदेश, काम पूर्णत्वाचे दाखले, कामाच्या मोजमाप पुस्तिका, झालेला खर्च, शिल्लक निधी याची माहिती घेत आहेत.हे करत असताना या आंदोलनात शाखा अभियंता कनिष्ठ अभियंता यांना डांबून ठेवण्यात येत असून वेठीस धरण्यात येत आहे तसेच अपशब्द वापरण्यात येत असल्याने त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मानसिक व शारिरीक स्थितीवर परिणाम होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.त्यामुळे ते गुरुवार पासून सामुहिक रजेवर गेले आहेत. जोपर्यंत आंदोलनावर वरिष्ठांमार्फत पुढील योग्य तो निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील असा निर्धार कर्मचाऱ्यांनी केला आहे.दरम्यान,ऐन उन्हाळ्यात अत्यावश्यक बाब असलेल्या पाणी पुरवठा विभागातील कर्मचारीच संपावर गेल्याने जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.